स. ठाणे
य काव्य
क्र. २३४२

# मैणी गान



REFBK-0022295
REFBK-0022295

संपादक : प्रा. र. का. कोलते

२३७२
काव्य
शर्मा
२२२८९
१५।८।५८

काव्य
संदर्भ
२२२९७
१५। ९।८८
2382

# रुक्मिणी-गान

# रुक्मिणी-गान

सौ. रुक्मिणीबाई पाटील

संपादक
र. का. कोलते
प्राध्यापक, मराठी विभाग
अमोलकचंद महाविद्यालय
यवतमाळ

REFBK-0022295
REFBK-0022295

सर्व हक्क संपादकाचे स्वाधीन

●

पहिली आवृत्ती १९७६
७ रु. २५ न. पै.

●

प्रकाशक
**दि. तु. पाटील**
मलकापूर
( बुलडाणा )

●

मुद्रक
**अ. ज. कोलते**
मे. अरुण मुद्रणालय, मलकापूर
( बुलडाणा )

पहिले संपादन पुष्प

माझे आईवडिल---

तीर्थरूप सौ. नर्मदाबाई कोलते

तीर्थरूप का. स. कोलते

यांना.

# ऋणनिर्देश

• • • • • •

माझी आई अनेक वर्षांपासून कविता लिहायची. कुणा-कुणासमोर म्हणूनही दाखवायची. ऐकणारांना मौज वाटायची. आनंद व्हायचा. मग तिचे अनेक कौतुक करायचे. पण हे सारे चार भिंतीच्या आतच चालायचे. जवळचे आप्तनातलग आणि घरी येणारे यांच्याशिवाय आईची कविता फारशी बाहेर गेली नाहीच. त्यामुळे ही कविता प्रकाशीत व्हावी असे सारखे मनाला वाटत असे. केवळ योगायोगानेच एकदा रमाकांत कोलते यांची आणि माझी या संदर्भात गाठ झाली. आईच्या कविता त्यांनी वाचायला मागितल्या आणि त्यातून संपादनाला सुरुवात झाली. जे अनेक वर्षांपासून मनाशी होते ते स्वप्न आज पूर्ण होत आहे याचा अत्यंत आनंद होतो !

या पुस्तकाला कविवर्य मंगेश पाडगावकरांनी प्रस्तावना दिली हे मी आमचे महद्भाग्यच समजतो. त्यांचे ऋण विसरणे शक्य नाही.

श्री. अ. ज. कोलते यांनी पुस्तकाची छपाई अत्यंत सुबक आणि नीट करून दिली. त्यांचाही मी आभारी आहे.

**दिनकर पाटील**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१२२९५
वा. क्र. काव्य
ग्रंथ २३०२

## आणखी काही थोडेसे

अगदी माझ्या लहानपणी रुक्मिणीबाईंनी आमच्या घरी - नरवेलला ( ता. मलकापूर ) आया-बायांसमोर गाणी म्हटल्याचे आजही मला अस्पष्टसे आठवते. पुढे ब-याच वर्षांनी एम. ए. झाल्यावर श्री. जी. आर. देशमुख (दाताळा) यांच्याशी झालेल्या चर्चेतून रुक्मिणी-बाईंच्या गाण्यांचे संपादन करण्याची कल्पना मला सुचली. आणि त्यातूनच ‘रुक्मिणी-गान’ रूपाला आले.

ह्या माझ्या लहानशा प्रयत्नाचे सर्वप्रथम श्रेय माझ्या गुरूजनांनाच आहे. मराठवाडा विद्यापीठाच्या पदव्युत्तर मराठी विभागात शिकत असतांना गुरुवर्य प्रा. वा. ल. कुळकर्णी, डॉ. यू. म. पठाण आणि डॉ. सु. न. रसाळ या त्रिमुर्तींनी वाङ्मयाच्या अभ्यासाची आणि लेखनाची जी गोडी लावली ती कशी विसरता येईल ?

या पुस्तकाच्या संपादन कार्यात महानुभाव वाङ्मयाचे अग्रगण्य संशोधक आणि गाढे अभ्यासक तीर्थरूप भाऊसाहेब डॉ. वि. भि. कोलते यांनी मला वेळोवेळी मदत केली आणि मार्गदर्शन केले.

कविराज मंगेश पाडगांवकरांनी तर ' रुक्मिणी-गान ' ला अंतरंग खोलून प्रस्तावना दिली !

माझे घनिष्ट मित्र प्रा. तु. ग. माने वर्धा व श्री. मु. वि. कोलते, बुलडाणा यांचे मला या कामी सतत उत्तेजन मिळाले आणि श्री. गजाभाऊ नारायणराव खर्चे यांचे अनेक प्रकारे अतिशय मोलाचे साह्य झाले.

प्रकाशनाचा भार श्री. दिनकरराव यांनी सांभाळला नसता तर ' रुक्मिणी-गान ' च्या प्रकाशनाचा हा मंगल दिन उजाळलाही नसता कदाचित.

या सर्वांच्या ऋणात मी तृप्त आहे !

२७ नोव्हेंबर १९७६<br>राजेन्द्र नगर<br>यवतमाळ

र. का. कोलते

# संपादकीय

सौ. रुक्मिणीबाईंचे काव्य मराठी वाचकांसमोर येत आहे याचा मनोमन आनंद होतो. रुक्मिणीबाईंचे काव्य हाती लागले आणि ते वाचतांना अनेकदा बहिणाबाईंच्या गाण्यांची आठवण झाली. डॉ. सरोजिनी बाबर यांनी संपादिलेल्या गाण्यांचीही आठवण झाली. अतिशय साधी आणि सोपी परंतु तेवढीच गोड अशी ही गाणी निश्चीतच वाचनीय आहेत. ती मनाला आनंद देणारी आहेत. रुक्मिणीबाईंचे वैशिष्ट्य असे की, बहिणाबाईंप्रमाणेच त्यांनी शाळेचा उंबरठाही ओलांडलेला नाही. मात्र आपल्या जिज्ञासूवृत्तीने आणि चिकाटीने त्यांनी अक्षरज्ञान करून घेतले आणि वाकडेतिकडे का होईना पण लिहायची सवय केली. अशा एका अशिक्षीत स्त्रीने आपले जीवनानुभव काव्यरूपाने व्यक्त करावेत हे नैसर्गिक प्रतिभेचे लक्षण आहे यात शंका नाही.

बुलडाण्याचे सुप्रसिद्ध बॅ. टी. एस. पाटील यांच्या रुक्मिणीबाई ह्या पत्नी. मलकापूर तालुक्यातील दाभाडी या गावचे यांचे घराणे. बॅ. पाटील उच्च शिक्षणासाठी लंडन येथे असेपर्यंत रुक्मिणीबाईंचे वास्तव्य या लहानशा खेडेगावीच होते. दादासाहेब स्वदेशी आल्यापासून मात्र त्यांचे वास्तव्य बुलडाण्याला झाले. अर्थात दाभाडी काय किंवा बुलडाणा काय, यापैकी कुठेही रुक्मिणीबाईंना आपल्या काव्यनिर्मितीला पोषक असे वातावरण लाभले नाही. बुलडाणा आणि मलकापूर या सभोवतालच्या परिसराचा आणि साहित्य-निर्मितीचा फारसा जवळचा संबंध नाही. मराठी कवितेला वैचारिकतेचा दर्जा प्राप्त करून देणारे कवी ‘ बी ’ आणि महानुभाव पंथाच्या वाङ्मयाचे अग्रगण्य

संशोधक व कवी डॉ. भाऊसाहेब वि. भि. कोलते यांचा संबंध जरी मलकापूरशी असला तरी तो प्रामुख्याने त्यांचे जन्मठिकाण या दृष्टीनेच आहे त्यांच्या वास्तव्याचा लाभ या परिसराला साहित्यदृष्ट्या फारसा घडला असे म्हणता येणार नाही.

रूक्मिणीबाईंना अशा साहित्यिकांचा सहवास तर लाभलाच नाही पण घरचे वातावरणही त्यांच्या काव्यनिर्मितीला पोषक होऊ शकले नाही. बॅ. पाटील बुलडाणा नगरपालिकेचे अध्यक्ष, विधान सभा सदस्य आणि खासदार अशा विविध बहुमानाच्या आणि जबाबदारीच्या पदांवर राहिल्याने घराशी राजकारणाचा संबंध अधिक दृढ झाला आणि राजकीय धाई–गर्दीच्या जीवनात रूक्मिणीबाईंच्या साहित्यनिर्मितीच्या गुणांकडे मात्र अक्षरशः दुर्लक्ष झाले. एक महत्त्वाची गोष्ट मात्र अशी झाली की, त्यांनी लिहिलेल्या कागदांचे जतन झाले. रुक्मिणीबाईंच्या मुलांनी या बाबतीत विशेष काळजी घेतली. त्यातही त्यांच्या सून सौ. प्रतिभाताई यांनी त्यांच्या या जीर्ण झालेल्या कागदावरील गाणी नव्याने लिहून ठेवली. या कार्याचे मोल विशेष आहे. तसेच आपल्या आईची ही गाणी जगासमोर यावीत असे रुक्मिणीबाईंच्या मुलांना – श्री. वासुदेवराव, श्री. दिनकरराव, सौ. प्रमिलाताई यांना सतत वाटत असे. म्हणूनच ही गाणी जपल्याही गेली आणि प्रकाशनाच्या दृष्टीनेही प्रयत्न झाला. एरवी विविध कल्पनांनी नटलेली रुक्मिणीबाईंची गाणी बरीचशी नष्टही झाली असती.

रुक्मिणीबाईंनी आज आपल्या वयाची सत्तरी ओलांडलेली आहे. गेल्या ८ । १० वर्षापूर्वीपर्यंत त्यांचे लेखन चालू राहिले. आयुष्यभर भरपूर लिहून ठेवले. पण लेखनाच्या सुरवातीपासूनच नाट्यकाव्यादी साहित्यनिर्मिती करणाऱ्या किंवा या साहित्याची गोडी घेणाऱ्या रसिकांपर्यंत रुक्मिणीबाईंचे साहित्य पोचणे आवश्यक होते. पण तसे घडले नाही. घरी येणाऱ्या चार पाहुण्यांपलीकडे ही गाणी गेली नाहीत. अर्थातच साहित्याच्या दृष्टीने या गाण्यांचे मोल कुणाला वाटले नाही. समकालीन साहित्यिकांशी आणि साहित्याशी जर रुक्मिणीबाईंना संबंध जोडता आला असता तर त्यांच्या प्रतिभेला अधिक चांगले वळण लागले असते. सामाजिक चाली–रूढींप्रमाणे जीवन

जगण्यालाही पुष्कळच मर्यादा राहिल्या. रुक्मिणीबाईंना घर-आंगण या पलीकडे फारसे स्वतंत्र जीवन लाभले नाही. परिणामी विविध जीवनानुभवांपासूनही त्या वंचीतच राहिल्या. या विशिष्ट परिस्थितीत सापडलेल्या रुक्मिणीबाईंच्या गाण्यातील अनुभवविश्व मर्यादीत राहिले आणि लेखनातही विस्कळीतपणा राहिला. चांगल्या चांगल्या कल्पना व्यक्त करतांना संगतीसाधल्या गेली नाही. त्या इतस्ततः विखुरल्या गेल्या. पुनरावृत्ती तर किती तरी होत गेली. त्यामुळेच समान विषयावरील ओळी एकत्र आणून त्यात संगती लावण्याचा मी प्रयत्न केला आणि गाण्यांची शीर्षकेही शक्य तेवढी समर्पक अशी देण्याचा प्रयत्न केला.

आता याठिकाणी, रुक्मिणीबाईंनी जी गाणी लिहिलेली आहेत त्यांचा ललित – वाङ्मयाच्या दृष्टीने विचार करावयाचा आहे. या गाण्यांची वैशिष्ट्ये कोणती ? यातून व्यक्त होणारे अनुभव कोणते ? ते कितपत कलात्मक रितीने व्यक्त होतात ? या गाण्यांचा विचार, म्हणजे या प्रश्नांचाच विचार करावा लागेल.

रुक्मिणीबाईंच्या गाण्यांची रचना अतिशय साधी, सोपी आणि सरळ असली तरी तेवढीच ती मधुर आहेत. या रचनेतून कवयित्रीचे प्रांजळ मन, विशिष्ट मूल्यांवर असणाऱ्या त्यांच्या श्रद्धा आणि मानवी जीवनाबद्दलचा त्यांना असणारा कळवळा सतत व्यक्त होतांना दिसतो. त्यांची गाणी विविध विषयांवर लिहिलेली आहेत. विशिष्ट घटना – प्रसंगातून स्फुरलेली ती रचना आहे. काही गाणी व्यक्तीचे चित्रण करणारी आहेत तर काही गाणी कथात्मक अशा स्वरूपाची आहेत. अशा कथात्मक गाण्यात त्यातील व्यक्तिमनाचे स्वरूप साकार करण्याचा रुक्मिणीबाईंचा प्रयत्न असतो. 'सूर्य – चंद्र', 'मोट – बारी', 'स्त्री - जन्मा तुझी कहाणी', 'चमत्कार झाला', 'लाडकीलेक', 'फाजील लाडावलेली मुलगी' ही गाणी माझ्या वरील विधानाचा प्रत्यय आणून देतील.

'पतिव्रता', 'आई', 'शेतकरी', 'पति हेचि देव' इत्यादी प्रकारची रचना तसेच पंढरपूरच्या पांडुरंगाचे मनोभावे गुणगान गातांनाही रुक्मिणीबाईंच्या रचनेला बहर येतो. गाण्यांचा काही भाग बोधपर अशा स्वरूपाचाही आहे. हा बोध – उपदेश प्रामुख्याने माणसाचा त्याच्या अज्ञानाने

किंवा व्यसनीवृत्तीने जीवनाचा जो नाश होतो, तो नाश होऊ नये आणि त्याचे जीवन सार्थकी लागावे या मानवाबद्दलच्या कळकळीतून होतो. या बोधाच्या बुडाशी जिव्हाळा – आत्मीयता असल्याने गाणी रटाळ न होता मधुरच वाटतात यात शंका नाही.

'दाट झाडी' हे या गाण्यांचे खास वैशिष्ट्य आहे. बॅ. पाटील पाच वर्षे विलायतेत शिकत असतांना त्यांना जो विरह घडला त्याचे चित्रण यात आले आहे. याठिकाणी प्रतिमाद्वारा व्यक्त झालेले अनुभव अत्यंत प्रत्ययकारी आहेत. रुक्मिणीबाईची 'उखाणे' या सदराखाली येणारी गाणीही मोठी मजेदार आहेत. त्यांच्या कल्पकतेचा विलास यातून लक्षात घेण्यासारखा आहे.

'अंथरुणाच्या बाहेरी' 'अरे संसार संसार' 'तोवरी त्याचा ओढा' 'नुसते टोकर, धुंद तुझ्या डोळ्यांत', 'नदी सारी रे आटली', 'दोन शब्द गोड,' 'ज्याचे त्याला भोग', इत्यादी शिर्षकांखाली येणाऱ्या गाण्यांतून रुक्मिणीबाईची बोधपर आणि उपदेशपर वृत्ती आपणाला आढळून येते.

'अंथरुणाच्या बाहेरी
नको पाय पसारा
कामी पडे ना रे बाबा
श्रीमंताचाही आसरा'

अंथरुणाच्या बाहेर पाय पसरविल्यास माणूस कर्जबाजारी होतो आणि मग त्याला 'तुटून पडले आकाश' असे वाटते. 'हरामाची इस्टेट' तर मुळीही नको कारण ती दुर्जनाची कृती आहे. पण,

'दुर्जनाच्या कृतीने
भरा पैशाचे पोते
चंदनाची सुंगधी
त्याला थोडीच येते'

माणसाच्या कृतीला 'चंदनाची सुगंधी' हवी असे रुक्मिणीबाईना वाटते. 'नदी सारी रे आटली' या गाण्यात दारुने माणसावर किती भयानक अवस्था

आणली याचे चित्रण येते तर ' दारु आणि रांड ' ही जोडी माणसाच्या सांसारिक जीवनाला अक्षरश : धुळीसच लावते याचे भीषण आणि करुण चित्र रुक्मिणीबाईच्या शब्दातून साकार होते. त्या म्हणतात,

' दारु नि रांडीने
आग लागली घराला
चार फुटाणे नाही
तुझ्या पोटच्या पोराला '

अशी भयानक अवस्था झाली ' कर्जाने भणंग ' होऊण ' संसाराचा रंग ' गेला ' कर्जाच्या बोजाचे डोक्यावर भारे ' बसले. रांडीला बोरमाळ हवी, चितांग हवा, पुणेशाही ठुशी हवी, सोन्याचे फूल हवे आणि घरी लग्नाची बायको मात्र ' लुगड्याला गाठा ' मारते ! तू रांडीसाठी नोटा फेकल्या आणि घरच्या बायकोला मात्र रिकामा लोटाही ठेवला नाही ! तू मुंबई पुण्याच्या फेऱ्या मारल्या आणि आपल्या घराच्या वीटा घसरत गेल्या तरीही त्याचे भान नाही ! अशाप्रकारे ' तुझ्या टाळूवर तीने मीरे वाटले ' एवढेच काय पण तीने ' लाकडाच्या सालीवाणी तुला उभाच सोलला ! रुक्मिणीबाईच्या या गाण्यातून मानवाबद्दलचा कळवळाच व्यक्त होत नाही काय ? कारुण्याचे चित्र साकार होते आणि अभिव्यक्तीलाही माधुरी लाभते. त्या जेव्हा म्हणतात,

' दारु आणि रांड
तीने संसाराला भंग
कर्जाने भणंग
गेला संसाराचा रंग '

तेव्हा त्या रचनेतील लय आणि नाद मनाला आनंद दिल्याशिवाय राहत नाही. नरदेहात येऊन काही तरी चीज केले पाहिजे. अज्ञानी मनाला ' ग्रंथ वाचून ' शहाणे करायला हवे, सज्जनाची संगत धरायला हवी, ' राऊळात जाऊन ' भजनाची गोडी घ्यायला हवी असाही बोध काही ठिकाणी येतो.

दुसऱ्याने दिलेले सर्वच मर्यादीत असते म्हणून त्या म्हणतात,

‘ दुसऱ्याच्या ओंजळीत
पाणी येईल घोटभर
आपल्याच हाताने
तू घे ना पोटभर ’

लक्ष्मीबाई टिळकांनीही आपल्या आत्मचरित्रात म्हटले आहे की दुसऱ्याने दिलेले पुरत नाही आणि आपल्या हातचे कधी सरत नाही. रुक्मिणीबाईंच्या वरील गाण्यातूनही तोच भाव व्यक्त होतो. आणि त्यातूनही मानवजातीबद्दलचा जिव्हाळाच व्यक्त होतो.

रुक्मिणीबाईंच्या गाण्यांमध्ये काही गाणी भक्तिपर अशा स्वरूपाची आहेत. पंढरीच्या पांडुरंगाचं गुणगान त्यात आलेलं आहे. कोणत्याही व्यक्तीचं मन किंवा प्रकृती हीच त्या व्यक्तीच्या साहित्याचं स्वरूप ठरवीत असते. साहित्यातून व्यक्तिमनच प्रगट होते. रुक्मिणीबाईंच्या गाण्यांमधूनही त्यांचे मन प्रगट होत असल्यास नवल नाही. हे मन कसे आहे? जात्यावरील गाण्यांमधून पांडुरंगाबद्दलचा प्रेमभाव व्यक्त होतो.

‘ दळण दळते गाते
गाणे मी देवाचे
माझ्याजवळी आले
पांडुरंग केव्हाचे
पांडुरंग माझा बाप
रुखमाई माऊली
संत गाती अभंग
नाचती पाऊली ’

किंवा आषाढी-कार्तिकीला पंढरपूरला जाऊन टाळ-मृदंगाच्या नादात खूप गावे आणि नाचावे असेही रुक्मिणीबाईला वाटते.

‘ टाळमृदंगाचा नाद
ऐकावा कानी
बहु नाचावे गावे
वाळवंटी कीर्तनी ’

प्रत्यक्षात मात्र रुक्मिणीबाई आपल्या आयुष्यात पंढरपूरला कितीदा गेल्यात हा प्रश्नच आहे! पण मन मात्र असे आहे. कधी कधी कल्पनारम्य असे स्वप्नही ह्या गाण्यांमधून व्यक्त होते.

'दिंडी थांबली अंगणी
किती आनंदले मनी
संत नाचती भजनी
पालखी खांद्या घेऊनी
स्वप्नातल्या पालखीत
झाले विठोबा दर्शन
धरी संतांचे चरण
मन झाले समाधान'

रुक्मिणीबाईंच्या या स्वप्नरंजनाने भक्तशिरोमणी नामदेवांच्या स्वप्नविश्वाची आठवण झाल्याशिवाय राहात नाही. देवाच्या दर्शनासाठी 'मी मासोळी तडफडे' असेही म्हटल्या जाते. तुकारामही म्हणतात, 'जीवनावेगळी मासळी। तैसा तुका तळमळी' तोच भाव रुक्मिणीबाईही व्यक्त करतात.

हरिनामाची गोडी असायला हवी. पैसा-दागिना कुठवर कामात येईल? नरजन्माला खरा 'आसरा रामाचा'च आहे. दूर डोंगरी असलेल्या सोन्याच्या वीटा काही उपयोगाच्या नसून रामनामाच्या राशी त्यांना अधिक समाधान देतात. एका गाण्यातून तर त्या आषाढी-कार्तिकीच्या गजबजलेल्या पंढरपुरात आणि 'जय-हारी-विठ्ठल'चे गजर घुमत असतांना 'गर्दीला सारूनी घाई-घाई' येतात आणि म्हणतात,

'विठ्ठल माझा बाप आई रखुमाई'

एवढेच काय पण,

'हा माझा संसार
हे माझे घर
हे माझे गुरु
हे माझे ईश्वर'

विठ्ठल हेच आपले सर्वस्व आहे. भक्ताची भूमिका उत्कटतेने याठिकाणी व्यक्त होते. जात्यावरील ह्या गाण्यात प्रसन्नता आणि आनंद ओसंडून वाहतो.

‘ दळण मी दळते
गीत गायन देवाला
वरण्यापरत माझ्या
हर्ष या जीवाला ’

विठ्ठलाचं गुणगान करतांना क्षणाक्षणाला आनंद होतो. दळण्याच्या प्रक्रियेत ‘ वरण्यापरत ’ हा शब्द सार्थपणे येतो.

रुक्मिणीबाईंची काही गाणी तर भक्ताच्या मनाचे आतुरता आणि उत्कटता व्यक्त करणारे चित्रच आपल्या डोळ्यासमोर उभे करतात.

‘ संध्याकाळ झाली
आशा लागली घराची
केव्हा पाहीन बाई
मूर्ती केशवाची ’

जणूं कुठून तरी यायला उशीर झाला आहे आणि मग केशवाचे दर्शन केव्हा होईल असे मनाला झाले आहे. मग —

‘ परडी भरून फुलं
पारिजातकाचे वर
आली दर्शनाला
खूष झाले मुरलीधर ’

पूजा करतांना तर —

‘ रक्ताचं केलं तेल
कातडीची केली वात ’

उत्कटतेतून व्यक्त होणाऱ्या बोलांना काव्यात्मता लाभते. कातडीची वात रक्ताच्या तेलात लावून पणती लावली. पूजा केली आणि कोणते स्वार्थाचे मागणे केले ?

'नित्य प्रकाश ठेवा
देवा माझ्या हृदयात.'

एवढेच.

'आई' वर अनेक कवींनी कविता लिहिल्या. रुक्मिणीबाईंनीही आईची महती गाणारी गाणी लिहिली. या रचनेतील गोडवाही आईच्या प्रेमाइतकाच गोड आहे.

आईची माया मऊ मऊ लोणी आहे. ती प्रेमाची पाखर आहे. त्याची गोडी 'आंब्याच्या अमृत फळासारखी' आहे. ती दुधावरची सायच आहे. आईचं प्रेम हे 'निर्मळ गंगेचे पाणी' आहे - जणू 'आकाशाचा घेर'च आहे. अशा बहुविध प्रतिमांतून आईची महती साकार केली जाते. अशा या आईचे —

'आई तुझे प्रेम,
मला नखभर पुरे
नको हवेल्या माड्या
झोपडीतही आनंदी वारे'

नखभर प्रेमानेही झोपडीत आनंदी आनंद होतो मग तिथे हवेल्या-माड्यांचीही आवश्यकता नसते. आईशिवाय इतरांच्या प्रेमासाठी 'उन्हाळ्याचे फुफ्फूट' अशी प्रतिमा येते. हे फुफ्फूट वरवर Plain असते पण त्याच्या आत कुठे खाचखळगा असेल याचा नेम नसतो. जणू ते कपटी मनाचे असते. आईही कठोर असते. पण ती कठोर असली तरी, –

'आई किती का मारेना
तरी म्हणेल सोनिया'

मारते पण 'सोनिया'च म्हणते !

कोणत्याही स्त्रीला पती हेच सर्वस्व. 'पती हेचि देव' असा भाव रुक्मिणीबाईही व्यक्त करतात. त्या म्हणतात —

'संसाराला भूषण
सर्व काही पतीचं'

'तोंडावरी तेज जसं
नाकातल्या नथीचं'

आणि म्हणून देवाला प्रार्थना होते —

'सकाळी उठून
हात जोडते मी देवा
माझ्या कुंकवाला
भरदार तेज ठेवा'

आपली पतिनिष्ठा आणि पतिबद्दलचे समाधान व्यक्त करतांना रुक्मिणीबाई म्हणतात —

'माझ्या प्रपंचात
खरं अमृताचा रस
हळदी कुंकवाने
माझी भरलेली पस'

रचनेला अर्थपूर्णत्व लाभते आणि गोडवाही निर्माण होतो. 'अमृताचा रस' लाभणाऱ्या या प्रपंचात पैशाला आणि दागिन्यांत गौणत्व असते आणि मग -

'कोणाच्या पैशाचा
दागिन्याचा नाही हेवा
पतीला दीर्घायुष्य
मागते मी देवा'

असा भाव व्यक्त होतो. पतीबद्दल हा भाव असणाऱ्या स्त्रीमनाला 'सौभाग्य-लेण्यां'विषयी अपार श्रद्धा आणि आत्मीयता असल्यास ते त्या व्यक्तिमनाच्या धर्माला–स्वभावाला सुसंगतच नाही काय ? आमच्या संस्कृतीत कुंकवाला आणि मंगळसूत्राला एक विशेष मोल आहे. 'कुंकू' तर सौभाग्यवती स्त्रीचे जीवन आहे. 'शेरभर सोनं' ही मोलाचं नाही. कपाळीचं कुंकू महत्वाचं आहे. म्हणून रुक्मिणी बाईंना वाटते.

‘ शेरभर सोनं
काय करिता सोन्याला
पूर्ण आयुष्य मागावं
शेजच्या धन्याला ’

स्त्रीला ‘ शेजचा धनी ’ मोलाचा आहे. मग ‘ दागिन्यांचा ढीग ’ ही नको आहे.

‘ दागिने दागिने
नको दागिन्यांचा ढीग
लावा कपाळाला कुंकू
या करंड्याला शीग ’

तर ‘ करंड्याला शीग ’ हवी. अर्थगर्भ शब्दांनी गाण्याला काव्यात्मता लाभते. ‘ दागिना ’ शब्दांच्या पुनरावृत्तीने रचनेला लय प्राप्त होऊन गोडवा लाभतो. भावपूर्ण मन व्यक्त होते. भावसंपन्नतेच्या दृष्टीने रुक्मिणीबाईंच्या खालील ओळी तर वाचनीय आहेत.

‘ नको हो पैठणी
नको मला शालू शेले
कपाळ हवे माझे
कुंकवाने भरलेले
नको मज बिंदी
नको चंद्रहार
पुरे एक अलंकार
मंगळ सूत्र ’

पैठणी नको शालू–शेले नको बिंदी नको नि चंद्रहारही नको ! मग कोणता दागिना हवा ?

दागिना मागते एक तुम्हापाशी
जन्मोजन्मी ठेवा दासीला या पायापाशी

‘ दासीपण ’ हाच दागिना आणि तोही जन्मोजन्मी द्या ! वटपौर्णिमेला स्त्रीचे देवाला हेच मागणे नसते का ? आत्मसमर्पण हा भारतीय स्त्रीचा

विशेष आहे. तिचा तो सहज धर्म आहे. आपली सुख दुःख सारं काही तीने पतीच्या जीवनालाच समर्पीत केलेली असतात. आणि म्हणूनच पतीच्या दासी–पणात आनंद व्यक्त होतो. आपल्या पतीला स्त्री असे दासीपण

'देशील रे देवा देशील ते थोडे
मी मागते हळदी कुंकू–राखोडे'

हळदी कुंकवालाच – सौभाग्यालाच सर्वाधिक महत्व आहे. रुक्मिणीबाईंनी कुंकू-राखोडे असा शब्द प्रयोग केला आहे. राखोडे हा शब्द 'अंगारा' या अर्थी येत असावा. देवाचा नमस्कार घेतल्यावर मोठ्या भक्तिभावाने कपाळी अंगारा लावतात. त्यामागे असणारी भावनाच कुंकवाबद्दल रुक्मिणीबाईंनी ठेवलेली आहे.

स्त्रियांच्या जगात उखाण्याचं एक खास महत्व आहे. विशेषतः तीळ संक्रांतीच्या वेळी उखाण्याच्या कोंदणात आपल्या पतीचं नाव हौसेनं बसविण्याची आपल्याकडे परंपरा आहे. हा उखाणा घेण्यात आणि दुसऱ्यालाही घ्यायला लावण्यात एक आगळी मौज आहे. या उखाण्यातून स्त्रीचे मन तिच्या भावना तिची पतिबद्दलची श्रद्धा-प्रेम-निष्ठा–आदर स्वाभिमान व्यक्त झाल्याशिवाय राहत नाही. या उखाण्यांमध्ये आपल्या पतीच्या गुणांचं गान असणं तर अतिशय स्वाभाविक आहे. अशा या उखाण्यांची रचना रुक्मिणी-बाईंनी मोठी मजेदार केली आहे. त्यातून त्यांच्या कल्पनांचा चौफेर विलास दिसून येतो.

' गंगेच्या काठावर बांधला महाल सुंदर
राव असे मिळाले, आली नशीबाला बहर '

रुक्मिणीबाईच्या उखाण्यातून ' गंगेच्या काठावर सुंदर महाल बांधणारे राव येतात, ' हिऱ्या माणकांनी पस भरुन देणारे राव ' येतात, ' फूल बागेत दिमाखाने विहरणारे राव ' येतात आणि ' संसारात अमृताचा रस निर्माण करणारे राव ' ही येतात.

या उखाण्यांच्या गाण्यातही वेगवेगळे प्रयोग रुक्मिणीबाई करतात. ' राव ' पत्त्याच्या डावात बसले आहेत आणि लवकर घरी येत नाहीत अशी

कल्पना करुन एक्का ते राजाच्या पानाला यमक साधून उखाणे रचतात. आणि मग त्यातून ' राव लवकर या घरी ' अशी भेटीला आतुर झालेल्या मनाची भावना व्यक्त होते.

' राणीच्या शेजारी ठेवून या राजाला
राव खेळ जिंकून लवकर या घराला. '

' राणीच्या शेजारी राजाला ' ठेवून देण्याच्या कल्पनेलाही गोड अर्थ आहे. आणि लवकर या तेही जिंकून !

आपल्याकडे काही स्त्रिया आलेल्या आहेत आणि त्या सर्व ' नाव ' घेण्याचा आग्रह करीत आहेत अशी कल्पना करुन मग त्यांच्याच आडनावाला यमक साधून काही उखाणे रचले आहेत.

' बघा हिरव्या रानी कशी बागडते हरणी
रावांचं नाव बाई ऐका कुळकर्णी '

किंवा

' कृष्णाची किती नावं त्यात गोविंद माधव
रावांचं नाव बाई ऐका तुम्ही जाधव '

हिरव्या रानात बागडणाऱ्या हरिणीच्या सुखाची प्रतिमा साकार होते आणि त्यातून ' रावांच्या ' सहवासात तसेच सुख लाभत असल्याचा प्रसन्न भाव उमटतो. अशी ही उखाण्यांची रचनाही प्रसन्नविणारी आहे.

' दाट झाडी ' हे रुक्मिणीबाईचे एक खास वैशिष्ट्य. आपले पती पाच वर्षासाठी परदेशात शिकायला राहिले हा काळ म्हणजे ' दाट झाडी ' अर्थात रानासारखा. त्या रानातलं जीवन असह्य. पतीचा विरह कायमचा. हा विरह गाण्यामधून व्यक्त होतो. या ठिकाणची अभिव्यक्ती लक्षात घेण्यासारखी आहे. विविध प्रतिमांतून अनुभव साकार होतो.

' नाथा हाल कष्टामध्ये
देहाची झाली हाडं
रंधा फिरवूनी जसे
खासले लाकूड '

रंधा फिरविण्याची, वखराच्या पासीने शेत वखरण्याची, छातीत किक्र फिरविण्याची, उसाच्या चरक्यात रस काढण्याची, जाते टाकविण्याची अशा कृषी जीवनातील प्रतिमा येतात.

एकत्र कुटुंबपद्धतीतील जीवनात पतिविरहीत जगतांना ऐकाव्या लागणाऱ्या शब्दांनी होणारे दुःख रुक्मिणीबाई अतिशय उत्कटपणे आणि सुंदर प्रतिमातून व्यक्त करतात. त्या म्हणतात,

‘ शब्द बाण सुटत
नसा नसा तुटत
सुरुंग लावून जसे
गोटे हाडाचे फुटत ’

सुरुंग लावावा आणि भल्या मोठ्या पाषाणाचे तुकडे तुकडे व्हावेत तसे शब्द बाणानी होणारे दुःख होते. याठिकाणी चरित्र शोधणे हा उद्देश नाही तर अनुभव कशा पद्धतीने व्यक्त होतो हे बघावयाचे आहे. रुक्मिणी–बाईच्या गाण्यामध्ये ठिकठिकाणी सुंदर वाक्प्रचारांची पखरणही आढळून येते. त्यामुळे गाणी अर्थभरीव होतात.

काही थोर व्यक्तींच्या गुणांचं गान करणारी गाणीही रुक्मिणीबाईनी लिहिलेली आहेत. भक्त प्रल्हाद, तुकाराम, गांधीजी आणि नेहरु अशा व्यक्तींचं गान चार–सहा ओळींमधूनही करुन जातात.

तुकारामाबद्दल रुक्मिणीबाई म्हणतात,

‘ तुका विठोबाचा भुका,
नको जडजवाहिरी
तुका रमतो कीर्तनी
मुखी अभंग झरती ’

नेहरूंच्या निधनाने ‘ दुःखाने हालली भूमी ’ असे त्या म्हणतात. आणि भारताचं कसं होईल ही चिंताही त्यांना वाटते.

‘ वाटे भारताचं आता कसं होईल
आणि मग ढळढळा आकाशाला रडू आलं ’

साऱ्या आकाशालाच रडूं आलं. जणूं साऱ्या भूमीचे आणि आकाशाचेही नेहरूजींवर प्रेम होते. येथे रचनेतील भावसौंदर्य मनाला मोहून टाकते.

'शेतकरी', 'पतिव्रता', 'पोळा' यावरही रुक्मिणीबाईंची सुंदर गाणी आहेत. शेतकरी 'आम्ही दैवाचे दैवाचे शेतकरी' समाधानाने स्वतःला म्हणतो. पाऊस-ऊन-थंडीचं जीवन असलं आणि त्यामुळे जीवाची जरी 'माती-माती' होत असली तरी आम्ही दैवाचेच ! 'नको रे देवा कोणाच्या दारी' यातून आमचे आम्हाला भरपूर आहे ही समाधानाची भावना व्यक्त होते. शेतात 'धस-काशा-कुंदा' होतो आणि तो काढण्यासाठी 'त्याला साहाय्य गोविंदा' करतो.

'पतिव्रते'चं गाणं तर फारच मधुर आहे.

'पतिव्रतेच्या दारी
देव पाहारे करी
खेटराची चवरी
छिन्नालीच्या डोक्यावरी'

पतिव्रतेच्या दाराला देवच पाहारा करतो. छीन्नालीला मात्र खेटराची चवरी मिळते ! आणि या पतिव्रतेचा छळ झाला तरीही —

'नवरा देतो लोटून
उंच कड्यावरून
देव धरतो खाली
फुलाचं अंथरूण'

फुलाचं अंथरूण देवाने धरल्यावर या पतिव्रतेला कशा यातना होतील ? रुक्मिणीबाईंची गाणी अशा ठिकाणी काव्यमय बनतात.

रुक्मिणीबाईंच्या गाण्यांमध्ये काही गाणीं कथात्मक स्वरूपाची आहेत. 'सूर्य-चंद्र', 'स्त्री जन्मा तुझी कहाणी', 'मोट-बारी'

'चमत्कार – झाला' अशी ही काही गाणी अतिशय मोजक्या – खरे तर एखाद्या दुसऱ्याच घटना प्रसंगातून एक चित्र आपल्या डोळ्यासमोर साकार करतात. 'सूर्य आणि चंद्र' या दोन भावात पृथ्वीच्या राज्याबद्दल युद्ध होते आणि मग देव त्यांच्यात न्याय करून –

'रजनीचे राज्य चंद्राला मिळाले
उषेच्या भाळी सूर्य विराजले'

अशी विभागणी करून देतात. गाण्याची सुरुवातच –

'सूर्य सोडतो बाण
सोडतो चंद्रावर
सोडतो चंद्रावर
डोळ्या लागे बरोबर'

अशी तालबद्ध रीतीने होते – आणि आपल्या मनाची पकड घेते. 'स्त्री जन्मा तुझी कहाणी' यात कौमार्यावस्थेत स्त्रीवर आलेल्या संकटामुळे 'गंगामाईत घेतलं बाळासह वाहून' अशा करूण जीवनाचं चित्रण अतिशय सुंदर रितीने होते.

'स्त्री जन्माची अशी करुण कहाणी
हृदयी अमृत परी नयनी पाणी'

'चमत्कार झाला' या गाण्यात एका संसारमग्न माणसाला कीर्तनकाराने संसाराचं व्यर्थत्व पटवून दिल्याची कथा येते. इथे रचना साधी असली तरी प्रवाहीपणा हा तिचा गुण मात्र दुर्लक्षिता येत नाही. 'मोट-बारी' या कथारूप गाण्यातही मोट हाणता हाणता 'सूर्य काना' होतो ( खास शेतकरी विश्वातला शब्द ) आणि मग न्याहारीची आठवण होते. शेतातली न्याहारी 'एकत्र' होते. हे खऱ्या अर्थाने सहजीवन असते. न्याहारीनंतर थोडी तंबाखू घेऊन अंग टाकल्या जाते पण पुनः लवकरच कामालाही लागायचे असतेच. कामाला हात लावतांना मात्र 'रामा' ला हाक मारायची आठवण असतेच असते.

उपरोधपूर्ण आणि उपहासपूर्ण अशा शैलीतूनही काही व्यक्तिमनांच्या वृत्ती रुक्मिणीबाई आपल्या गाण्यामधून व्यक्त करतात. नटवेपणाचा देखाव्याचा, फाजील लाडाचा याठिकाणी उपहास होतो. फाजील लडावलेली मुलगी आणि फॅशन यासारख्या कविता अशा व्यक्तिमनांचे चित्र रेखाटतात. महत्वाचे म्हणजे ही चित्रे प्रत्ययकारी असतात. एक उपवर आणि फाजील लाडावलेली मुलगी बापाला म्हणते.

'बाबा मला द्या न
नको देर जेठ सासू
गप्पा गोष्टी करून
मग आम्ही हासूं.'

किंवा असेही - 'बाबा मला द्या न
पहा मालक सोपा सापा
नको त्याचा धाक
काढीन मस्त झोपा'

फॅशनमध्येही असेच चित्र येते –

'नव्या फॅशनचे नखरे
घडी घडी बदलती
ऑफिसच्या वेळेला
नवरे उपाशीच निघती'

किंवा स्वयंपाक केला तरी,

'हवी पोमेट पावडर
मारती कागदावर कीरा
स्वयंपाक करिती असा
की नाही येत शीरा'

'म्हणे विचार करतो' यातही माणसाच्या आचारणातील विसंगतींचे दर्शन घडते.

'आरतीला पाव आणा
तो जीवावर आला
तमाशाला गेला
नोटांचा चुरा झाला'

'कीर्तनाला जा ना
म्हणे विचार करतो
नवा सिनेमा लागला
की गुलूगुलू बोलतो'

माणसाचं नशीब वेगवेगळे असते. या जगात श्रीमंत आणि गरीब यांच्यामधील दरी किती रुंद असते याचे वर्णन एका ठिकाणी येते. चोखामेळ्याच्या अभंगातूनही असाच भाव व्यक्त झाला आहे. रुक्मिणीबाई म्हणतात,

'श्रीमंताच्या पेटीला
पैशाचा झाला भार
एखाद्याच्या नशीबी
भाकरीची मारामार'

उपरोधपूर्ण आणि उपहासपूर्ण अशा शैलीतून जशी काही गाणी लिहीली जातात तशीच आत्मीयेतून आणि जिव्हाळ्यातूनही काही चित्रे रेखाटली जातात. 'भंपक-फॅशन' आणि 'फाजील-लाड' या गोष्टींबद्दल तिरस्कार असल्याने त्या विषयांचा उपहास झाल्यास काय नवल? पण लाडकी 'लेक' आणि 'माहेर' हे विषयच असे आहेत की कोणत्याही स्त्रीला त्याबद्दल अपार जिव्हाळा असणे अपरिहार्यच आहे. अर्थात या विषयावरील अनुभव तेवढ्याच मधुर रसातून न्हाऊन निघणे स्वाभाविक आहे. 'लाडकी लेक' मध्ये आईच मन--त्याची-स्निग्धता व्यक्त होते. मुलीचं कौतुक करतांना ती म्हणते,

'माडीवरती माडी
माडी उंच ही बाळाची
माडीवर उभी
माझी लेक ही लाडाची

ताई चालते घरात
चाळ वाजती छुनं छुनं
काम करिता करिता
रमते माझे मन '

लहानग्या मुलीचं हे चित्र साक्षात होऊन समोर उभे राहते. ही मुलगी लग्नाला आल्यावर साहजिकच ' भरल्या वैभवानं असलेले घर तिला शोधायचं असते श्रीमंताच्या घरची तिला मागणी येते. आणि मग कौतुकानं,

बाई तुझ्या नशीबानं
लाभले मोठ्ठे घरंदाज
जावई मोती दाणा
हिरकणीवर साज

इथे रचनेला काव्यात्मता लाभते–सौंदर्य लाभते. ही मुलगी लग्नानंतर सासरी जायला निघते तेव्हा तर या आईची ' मी काय काय देऊ ' अशी स्थिती होते. आणि मग ' गाडी ओझ्याने भरून ' जाते. बालपणापासून तर सासरी जाई–पर्यंतचे एक चित्र रुक्मिणीबाई आपल्यासमोर प्रत्ययकारीपणाने साकार करतात. या ठिकाणी रचनेला अनुभव साक्षात करण्याचे सामर्थ्य लाभते. एका विशिष्ट लयीतून शब्द येतात आणि चित्र समोर उभे राहाते. विषयाच्या जिव्हाळ्यामुळे ते अधिकच रम्य होते. ' लग्नाची वरात ' मध्येही रथाचे चित्र पाहा कस येते,

रथाच्या घोड्याचे
लाल रेशमाचे दोर
वरातीच्या वेळेला
पाऊल पडे तालावर

आपल्या मुलाच्या लग्नाच्या वरातीला तालावर चालणारा घोडा आणि त्यालाहि सुंदर लाल रेशमाचे दोर असणे हे मातृभावाला स्वाभाविकच नाही काय ?

स्त्रीच्या जीवनात इतर कोणतेही विषय जिव्हाळ्याचे असले तरी ' माहेर ' च्या जिव्हाळ्याची बरोबरी कोणत्या विषयाचा जिव्हाळा करू शकेल ? माहेर म्हणजे परमसुख. प्रत्यक्ष स्वर्गच. यापेक्षाही माहेर म्हणजे माहेरच !

खरं म्हणजे पुरुषांना याची काय जाणीव ? त्याला स्त्रीच्या भूमिकेतून विचार करावा लागेल. अशी स्त्री भूमिका तर ज्ञानेश्वर, तुकाराम स्वीकारतातच. म्हणून त्यांना ' माहेरा ' चं मोल कळू शकते. मग तुकाराम म्हणतात,

कन्या सासुराशी जाये। मागे परतोनी पाहे
तैसे जाले माझ्या जीवा। केव्हा भेटसी केशवा

येथे तुकाराम स्त्रीची मनोभूमिका स्विकारतात. मग त्यांना वाटते, परमेश्वराची भेट म्हणजे माहेरी जाणे. अशा या माहेरचं सुख तर अमोलिकच. पण केवळ माहेरची गाडी पाहूनही स्त्रीला किती आनंद होतो ! रुक्मिणीबाई गाण्यातून आपला अनुभव व्यक्त करतात.

आली आली गाडी
गाडीवर पडदे लाल
माझ्या माहेरची आहे
अशीच चाल

अशी आहे चाल
बैलांना झीला झूल
येतो माहेरचा मुऱ्हाळी
ताई दिवाळीला चाल

येते कधी घोडबग्गी
तसा आनंद नाही जगी
दिवाळीच्या सणाला
माहेरी बहिणी दोघी

ह्या गाण्यात आपल्या माहेरचं गुणगान – आपल्या माहेरच्या प्रत्येक गोष्टीचं कौतुक आणि गाडी दिसताच होणारा आनंद व्यक्त होतो. शब्दांच्या पुनः पुनः येण्यातून गाण्यात अधिकच गोडवा निर्माण होतो. लयपूर्ण आणि नादमयी भाषेतून चित्र समोर येते आणि या लयीमुळे आणि नादामुळेच अशा गाण्यांना गेयरूपही लाभते.

रुक्मिणीबाईंच्या रचनेत अनेक सुंदर वाक्प्रचारांची पखरण झालेली आपणाला दिसून येते.

हृदय पोखरणे, देहाची हाडं करणे, मूग गिळणे, पंख तोडणे, पाझर फुटणे, दात काढणे, काळीज खुलणे, सार्थक होणे, सुरी खुपसणे, जमिनीला भार असणे, दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिणे, मोरावानी वाट पाहणे, आकाश तुटून पडणे, पाणी जाणे, बोबडी वळणे, पाखर घालणे, रंग भरणे, वठणीवर येणे, ठोकर मारणे, प्रकाश पाडणे, चुगली सांगणे, दाटून येणे, बोंब करणे, बोल देणे, लाही लाही होणे, देहाची होळी करणे, काळीज खुलणे इत्यादी. हे वाक्प्रचार गाण्यांच्या रचनेला सौंदर्य प्राप्त करून देतात.

काही सुंदर आणि लक्ष्यात घेण्यासारखे शब्द-प्रयोगही रुक्मिणीबाई करतात. बाबडल्या तुरी, खेटराची चवरी, पापाचं आंगण, फुलाचं आंथरुण लपता-छपता, लाहा-लाहा इत्यादी.

ही गाणी कोणत्याही वृत्त-मात्रेत बंदिस्त होत नाहीत. यमकांचे सौंदर्य मात्र जिथे-तिथे विखुरलेले दिसते. वृत्त-अलंकारांची विशेष शोभा नसली तरी या सरळ आणि साध्या रचनेतील नाद-लय-शब्द सौंदर्य आणि त्यातूनच व्यक्त होणारे भाव सौंदर्य लक्षात घेण्यासारखे आहे आणि त्यामुळेच गाण्यात गोडवा निर्माण होऊन मनाला रसास्वादाचा आनंद लाभतो यात शंका नाही.

— र. का. कोलते

# प्रस्तावना

• • • • • •

माणसाला गाणे कां म्हणावेसे वाटते ? कविता कां लिहावीशी वाटते ? सुखदुःखाच्या भावना सर्वच माणसांच्या मनात निर्माण होतात. सुंदर दृश्य पाहिले की सर्वांनाच आनंद होतो. पण काही माणसेच अशी असतात की, ज्यांच्या मनात कसली तरी जादू होत असते. त्यांच्या मनात हा अनुभव केवळ अनुभव रहात नाही. त्या अनुभवांची कविता होते. असे कां होते हे सांगता येणार नाही. पण असे होते हे मात्र खरे. हा अनुभव त्यांच्या मनात रूजू लागतो. मग एका विशिष्ट लयीत शब्द जमू लागतात. जर एकादा शब्द मनासारखा जमला नाही तर विलक्षण अस्वस्थ वाटते. अस्वस्थतेच्या या तंद्रीत असतांना ही माणसे व्यवहारातली सर्व कामे करीत असतात. पण त्यांचे मन मात्र आतून तो शब्द शोधीत असते. काही वेळाने कळीचे फूल व्हावे तशी कविता निर्माण होते. सौ. रुक्मिणीबाई पाटील यांचे मन असेच आहे. त्यांच्या मनात येणाऱ्या भावना, विचार शब्दरूप घेतात. या भावनाविचारांतून बघता बघता कविता निर्माण होते.

वाल्मीकीच्या मनातल्या संताप-शोकाने श्लोकरूप घेतले ती पहिली कविता असे आपण मानतो. पण मला मात्र नेहमी वाटत आले आहे की, वाल्मीकीच्या अगोदर वाल्मीकीच्या आईने कविता गायिलेली असणार. जगातली पहिली कविता ही पुरूषाने लिहिली असेल असे मला वाटत नाही. जगातली पहिली कविता स्त्रीगीतच असणार अशी माझी श्रद्धा आहे. ही पहिली कविता अंगाई असेल, मुलाला भरवतांना म्हटली असेल, बाळाला औक्ष मागण्यासाठी गायिलेली असेल ...... कशीही असेल पण ती प्रथम स्त्रीनेच म्हटलेली असेल. सौ. रुक्मिणीबाई पाटील यांची कविता या उत्स्फूर्त स्त्रीगीताशी नाते जोडणारी आहे. स्त्रीगीताचा अस्सलपणा, सहजपणा त्यांची कविता वाचताना परोपरी जाणवतो. अशी ही निर्मळ गाणी लिहिण्यासाठी पांडित्याची, पदव्या मिळवण्याची कधीच कोणाला जरूरी वाटलेली नाही. पक्षी गाणे शिकण्यासाठी संगीत विद्यालयात कधी जातो काय ? आणि

म्हणूनच सौ. रुक्मिणीबाई या लौकिक अर्थाने शिक्षित नाहीत याचा मुद्दाम उल्लेख मला करावासा वाटत नाही. लौकिक शिक्षण न मिळालेल्या रुक्मिणीबाई अलौकिक अर्थाने शिक्षित आहेत. त्यांच्याजवळ विद्यापीठाच्या पदव्या नाहीत, परंतु त्यांच्या कवितेतला प्रत्येक शब्द ही त्यांना परमेश्वराने दिलेली पदवी आहे. कृपेच्या या दिव्याने त्यांची ओंजळ उजेडाने कशी भरून टाकली आहे. या न मावळणाऱ्या उजेडाने त्यांची गाणी चिंब भिजली आहेत. या उजेडाच्या कोवळ्या सरी सारख्या त्यांच्या मनावर रिमझिमत असतात. "देवाच्या देणगीने हे ठेविले लिहून" अशी एक ओळ त्यांच्या कवितेत आहे. ही ओळ म्हणजे या दिव्याचीच खूण आहे.

सौ. रुक्मिणीबाईंच्या कवितेतून त्यांच्या श्रद्धा अगदी सहजपणे व्यक्त झालेल्या आहेत. या श्रद्धांनी प्रत्येक घरकुलाला आधार दिला आहे. पतिनिष्ठा हा या कवितांतला एक प्रमुख प्रवाह आहे. या निष्ठेचे स्वरूप संपूर्णपणे पारंपारिक आहे.

**धर्म कधी सोडेना**
**जरी पती छळतो**
**पातिव्रत्याचे सामर्थ्य**
**देव मध्यें पडतो**

**नवरा देतो लोटून**
**उंच कड्यावरून**
**देव धरतो खाली**
**फुलांचं अंथरूण**

नव्या विचारांच्या आधुनिक स्त्रीला ही विचारांची पद्धती न रुचण्याची शक्यता आहे. न्याय-अन्यायाच्या जाणिवा प्रखर असलेली आधुनिक स्त्री आपले व्यक्तिमत्व हे एक श्रेष्ठ मूल्य आहे असे मानते. नवऱ्याने कड्यावरून लोटून दिले तरी त्याचे स्तोत्र गात बसावे ही गोष्ट नवविचारांच्या आधुनिक स्त्रीला रुचणारी नाही. परंतु रुक्मिणीबाईंचे भावविश्व या अर्थाने लढाऊ

नाही. ते पारंपरिक श्रद्धा जतन करणारे आहे. या संस्कारांनीच त्यांचे मन घडले आहे. या श्रद्धा जेव्हा त्या आपल्या कवितेतून व्यक्त करतात तेव्हा त्यात काहीसा भाबडेपणा, काहीशी सांकेतिकता जाणवते. परंतु त्याचबरोबर त्यांच्या या भावनेतला निर्मळ प्रामाणिकपणाही त्यांत जाणवतो. कसल्याही प्रकारचा आव त्या कधी आणीत नाहीत. या प्रामाणिकपणामुळे त्यांची कविता मनाला स्पर्श करून जाते.

जीवनातल्या लहानसहान क्षणांतून रुक्मिणीबाई आनंद टिपून घेतात. हा आनंद व्यक्त करतांना त्यांची कविता उत्स्फूर्तपणे चित्रमयी होते. 'माहेरची गाडी' ही त्यांची कविता अशा चित्रमयी शैलीचे उत्तम उदाहरण आहे. या गाडीची चाल, तिचा रंग त्या सहजपणें टिपून घेतात आणि तितक्याच सहजपणें मनातल्या भावनेचे रंग या रंगात एकजीव करून टाकतात. त्यामुळे हे चित्र केवळ बाह्य रंगरेषांचे चित्र ठरत नाही. ते भावचित्रही होते.

**आली आली गाडी**
**गाडीवर पडदे लाल**
**माझ्या माहेरची आहे**
**अशीच चाल**

**येते कधी घोडबग्गी**
**तसा आनंद नाही जगी**
**दिवाळीच्या सणाला**
**माहेरी बहिणी दोघी**

आज जीवन गुंतागुंतीचे होत चालले आहे. अनेक प्रकारचे ताण मन चहूबाजूंनी ओरबाडीत असतात. माणसाचे मन ही गुंतागुंत अधिकाधिक समजून घेण्याचा प्रयत्न करीत आहे. परंतु त्याचबरोबर जीवनातला आनंद घेण्याची शक्ती ओसरू लागली आहे की काय अशी भीती वाटू लागते. आधुनिक जीवनाला ग्रासू पहाणारी ही विकृती रुक्मिणीबाईंच्या सहजसोप्या कवितेत कुठेही दिसत नाही. परंतु याचा अर्थ असा नव्हे की रुक्मिणीबाईने माणसांच्या जीवनातले दुःख दिसत नाही, आपल्या घरकुलात त्या रंगून गेल्या

आहेत. परंतु या आनंदी घरकुलाच्या लहानशा खिडकीतून त्या बाहेरच्या जगाकडेही बघत आहेत. या बाहेरच्या जगातली विषमता त्यांना दिसते आणि त्या अस्वस्थही होतात :

श्रीमंताच्या पेटीला
पैशाचा झाला भार
एखाद्याच्या नशिबी
भाकरीची मारामार

एकाला लागे ऊन
खडे टोचती पायाला
दुसऱ्याला नाही घास
पाणी वाहे डोळयाला

हे दृश्य त्यांना आपल्या शब्दांतून साकार करावेसे वाटते.

याच लहानशा खिडकीतून त्या नव्या पिढीतल्या स्त्रीकडेही पहातात. अशा वेळी त्यांच्या कवितेत उपहास येतो. परंतु स्वभावतःच त्यांचे मन मायेने भरलेले आहे. या मायेमुळे हा उपहास कडवट होत नाही, तर त्यात मिस्किलपणा येतो :

नव्या फॅशनचे नखरे घडीघडी बदलती
ऑफिसच्या वेळेला नवरे उपाशीच निघती
नटण्या थटण्याचीच सदा धुंदी असे डोळयात
भरता येईना मग पुरण कणकी गोळयात
रंगी बेरंगी कपडे धुण्या ढीग साबण सोडा
बिलं देता देता खिसा पडतो लंगडा

असे या वैगुण्याचे, पोकळ फॅशनचे त्या गमतीदार वर्णन करतात. या वर्णनात

त्यांचा वडीलकीचा अधिकार, मनातली माया आणि जीवनाच्या सार्थकतेविषयीची त्यांची कल्पना एकाच वेळी व्यक्त होतात.

कविता प्रतिमांच्या भाषेत बोलत असते. कवीच्या मनातला अनुभव आपला आकार या प्रतिमांतूनच शोधीत असतो. या अनुभवाचा सच्चेपणा किंवा नकलीपणा कविता वाचतांना प्रतिमांतून जाणवतो. रुक्मिणीबाईंच्या कवितांतील प्रतिमा या दृष्टीने अभ्यासण्याजोग्या आहेत. त्यांच्या कवितांतील प्रतिमांना विलक्षण खरेपणा आहे. आपल्या भोवतीच्या जीवनातून त्या प्रतिमा निवडतात. एखादे पाखरू सहजपणाने येऊन झाडाच्या फांदीवर बसावे त्याप्रमाणे या प्रतिमा त्यांच्या कवितेतल्या ओळीत जणू सहजपणें येऊन बसतात. मुलांशिवाय घरादाराला शोभा नाही असे त्यांना म्हणायचे असते. ही भावना व्यक्त करण्यासाठी त्या गोठा आणि गाईवासरे ही प्रतिमा किती प्रभावीपणें वापरतात पहा :

**घरादाराला आहे शोभा लेकरांची**
**जशी गोठ्याला गाईवासरांची**

आईच्या प्रेमाचे वर्णन करताना त्या लिहितात :

**घातला दोर पोव्हरा, पाणी नाही विहिरीत**
**तशी आईविणा कुणाच्या मनी नाही प्रीत**

भक्तीची भावना हा रुक्मिणीबाईंच्या कवितेतील एक उत्कट प्रवाह आहे. भावनेचे एक महत्वाचे वैशिष्ट आहे. एका अर्थाने ही भावना पारंपरिक असली तरी ती कर्मकांडाच्या कैदेत बंदिस्त झालेली नाही. संतांविषयी त्यांना मनोमन आदर वाटतो. या संतांच्या पूजेसाठी त्यांना घर सोडून कुठे जाण्याची आवश्यकताच वाटत नाही. आपल्या निर्मळ भावनेतूनच त्या साक्षात्काराचा स्पर्श अनुभवतात :

**आषाढी कार्तिकी एकादशी आली**
**माझ्या अंगणात संतांची दाटी झाली**

या ओळी रुक्मिणीबाईंच्या वृत्तीचे दर्शन घडवतात. जिथे भक्ती आहे तिथे देव आहे आणि तिथेच संत आहेत. या भावनेमुळेच त्यांना संतांचा शोध घेत जावेच लागत नाही. उलट, संतच त्यांच्या भक्तीचा मागोवा घेत त्यांच्या घराच्या अंगणात येऊन दाटी करतात. या निर्मळ भक्तिभावामुळेच त्या लिहू शकतात की –

**काामामध्ये काम**
**मुखामध्ये राम**
**लांब नाही कुठे तो**
**आहे पाठीजवळ**

या श्रद्धेमुळे त्यांना हृदयातला प्रकाश किती सहजपणे सापडला आहे. त्या म्हणतात :

**भूमीवरी निजावे**
**पांघरावे आकाश**
**हृदयातल्या ज्योतीने**
**पाडावा प्रकाश**

कबीराने म्हटले आहे : ' साधो, सहजसमाध भली " देहदंडन नाही, तीर्थक्षेत्री वणवण नाही. भक्तीच्या निर्मळ लयीतच साक्षात्काराचे गाणे सापडते. हे सहजसमाधीचे गाणे कसलेही अवडंबर न पत्करता रुक्मिणीबाईंना सापडले आहे. कवितेतली ही सहजसमाधी आहे.

अशी ही रुक्मिणीबाईची कविता आहे. तिच्यात शब्दांचे कृत्रिम खेळ नाहीत. चमत्कृतींचा अवलंब करून स्वत:कडे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न ही कविता जराही करीत नाही. माणसाच्या जीवनात जे मंगल आहे त्यावर ती सहज प्रेरणेने प्रेम करते. रुक्मिणीबाई कविता करतात पण आपण कविता करतो याचे नाटकी भान त्यांना नाही. जी सहजता, जो भावनेचा अकृत्रिम ओलावा लोकगीतात, जात्यावरच्या ओव्यात आढळतो तोच या कवितात भरून राहिला

आहे. शहरातल्या धावपळीपासून दूर अशा निसर्गरम्य खेड्यात गेल्यानंतर मनाचे हरवू लागलेले आरोग्य जसे सापडते तसे रुक्मिणीबाईंच्या या कविता वाचतांना कलेच्या आरोग्याचा प्रत्यय येतो. खरे कवित्व ही एक कृपा आहे. या कृपेचा स्पर्श केव्हा, कुणाला आणि कसा होईल याचे गणित मांडता येणार नाही. कृपेचा हा किरण रुक्मिणीबाईंना शोधीत आला. या किरणाने त्यांच्या मनातले शब्द उजळून टाकले.

आत्मा उजळून टाकणारा कृपेचा हा किरण रुक्मिणीबाईंच्या कवितातून आपल्यापर्यंत पोहोचला याबद्दल आपण ऋणी राहिले पाहिजे.

"रुक्मिणीने एका तुळशिदळाने गिरिधरप्रभु तुळिला" हे भक्तीचे सामर्थ्य आपण जाणतोच. या रुक्मिणीनेही कवितेच्या तुळशिदळाने हेच साधले आहे.

—मंगेश पाडगांवकर



अनुभव हाच माणसाचा खरा गुरू
त्याच्या आधारावर केला ग्रंथ हा सुरू

मला नाही मुळी विद्या, सांगते मनापासून
वेडे वाकडे साहित्य घ्या तुम्ही गोड करून

स्फूर्ती देण्यासाठी माझ्या पाठी देव उभा
मी सांगते कविता, सून लिहिते प्रतिभा

वेडे वाकडे साहित्य देवा घ्या नं आमचे
हात मी जोडते आम्ही बालक तुमचे.

— रुक्मिणीबाई

# अनुक्रमणिका

## रुक्मिणी गान


| अ. नं. | कवितेचे नांव | पान नं. |
|---|---|---|
| १ | पतिव्रता | १ |
| २ | माहेरची गाडी | २ |
| ३ | शेतकरी | ३ |
| ४ | सूर्य - चंद्र | ४ |
| ५ | एखाद्याचं नशीब | ५ |
| ६ | सौभाग्य लेणं | ७ |
| ७ | लाडकी लेक | १० |
| ८ | लग्नाची वरात | १२ |
| ९ | फॅशन | १३ |
| १० | फाजील लाडावलेली मुलगी | १५ |
| ११ | देव होऊनीया आला | १६ |
| १२ | केव्हा पाहीन बाई | १७ |
| १३ | आई | १८ |
| १४ | विठ्ठल माझा बाप आई रखुमाई | २२ |
| १५ | कामामध्ये काम मुखामध्यें राम | २३ |
| १६ | रंग भरला अंगणी | २४ |
| १७ | एक नारायण तेज पृथ्वीला | २५ |
| १८ | तुका रमतो कीर्तनी | २६ |
| १९ | विरोध - भक्ती | २७ |
| २० | अंगाई - गीत | २८ |
| २१ | स्त्री - जन्मा तुझी कहाणी | ३० |
| २२ | भाऊबीज | ३१ |
| २३ | कृतघ्न | ३२ |
| २४ | अंथरुणाच्या बाहेरी | ३३ |
| २५ | अरे संसार संसार | ३४ |
| २६ | तेला वाचून वातीला | ३६ |

| | | |
|---|---|---|
| २७ | मोट – बारी | ३७ |
| २८ | अमृत – जेवू | ३८ |
| २९ | सुवासिनीचे लेणे | ३९ |
| ३० | वाळवंटी कीर्तनी | ४० |
| ३१ | आसरा – रामाचा | ४३ |
| ३२ | दळण दळते दळते | ४५ |
| ३३ | तोवरी त्याचा ओढा | ४६ |
| ३४ | सासुरवास | ४७ |
| ३५ | तुकोबा | ४८ |
| ३६ | गांधीजी | ४९ |
| ३७ | भूमिवरी निजावे पांघरावे आकाश | ५० |
| ३८ | फुलली जशी फुलंझाडं | ५२ |
| ३९ | नुसते टोकर | ५३ |
| ४० | म्हणे विचार करतो | ५५ |
| ४१ | चमत्कार झाला | ५६ |
| ४२ | पोळा | ५९ |
| ४३ | कोण लावील ठिगळ | ६० |
| ४४ | धुंद तुझ्या डोळयात | ६२ |
| ४५ | आली माहेरची गाडी | ६३ |
| ४६ | आणि मग आकाशाला ढळढळा रडू आलं | ६४ |
| ४७ | उखाणे | ६५ |
| ४८ | राव लवकर या घरी | ६८ |
| ४९ | उखाणे – व्यक्तीच्या आडनावाला | ७१ |
| ५० | दाट झाडीमध्ये | ७३ |
| ५१ | पती हेचि देव | ८० |
| ५२ | नदी सारी रे आटली | ८४ |
| ५३ | दोन शब्द गोड | ८८ |
| ५४ | तुझ्या परीस | ९२ |
| ५५ | संसार संसार | ९३ |


●●●

# शुद्धिपत्र

| | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|
| संपादकीय पान २ ओळ ५ | काव्यनिमितीला | काव्यनिर्मितीला |
| ओळ १३ | त्यांच्या | त्यांची |
| परिच्छेद ३ ओळ ३ | सुरवातीपासूनच | सुरुवातीपासूनच |
| पान ३ परिच्छेद ओळ ३ | त्याची | त्यांची |
| पान १२ | असे दासीपण | — असे 'दासी' पण मागतेच पण देवालाही म्हणते — |
| पान १७ शेवटची ओळ | आचारणातील | आचरणातील |
| पान १८ परिच्छेद २ ओळ २ | आत्मीयेतून | आत्मीयतेतून |
| ओळ ७ | आईच | आईचं |
| पान १९ परिच्छेद २ शेवटची ओळ | कस | कसे |
| परिच्छेद ३ | त्यालाहि | त्यालाही |
| पान २१ ओळ २ | येत | येते |
| शेवटचा परिच्छेद | नसला | नसली |

| कविता | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|
| पान १० | बाडाची | बाळाची |
| पान ११ | जावाई | जावई |
| पान २४ | रंग भरली अंगणी | रंग भरला अंगणी |
| पान २८ | तान्हा | तान्हया |
| पान ४७ | जोड | जोडा |
| पान ४९ | मानव् | मानव |
| पान ६३ | मोहरची | माहेरची |
| पान ७५ | किक | किक्र |
| पान ७६ | दुधड | दुघड |
| पान ८१ | होत | होते |
| पान ८२ | नारयणाची | नारायणाची |
| पान ८४ | राडीने | रांडीने |
| पान ८५ | तझ्या | तुझ्या |
| पान ८८ | खाउन | खाऊन |
| पान ९१ | कस | कसे |
| पान ९१ | सव | सर्व |

———

## पतिव्रता

पतिव्रतेच्या दारी
    देव पहारे करी
खेटराची चवरी
    छिन्नालीच्या डोक्यावरी

पतिव्रतेच्या दारी
    देव बसती राखण
छिन्नालीच्या घराला
    पापाचं आंगण

धर्म कधी सोडेना
    जरी पती छळतो
पातिव्रत्याचे सामर्थ्य
    देव मध्ये पडतो

नवरा देतो लोटून
    उंच कड्यावरून
देव धरतो खाली
    फुलाचं अंथरूण

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२२२१५
दा. क्र. काव्य
२३४२

# माहेरची गाडी

आली आली गाडी
गाडीवर पडदे लाल
माझ्या माहेरची आहे
अशीच चाल

अशी आहे चाल
बैलांना झीला-झूल
येतो माहेरचा मुऱ्हाळी
ताई दिवाळीला चाल

येते कधी घोडबग्गी
तसा आनंद नाही जगी
दिवाळीच्या सणाला
माहेरी बहिणी दोघी

दिवाळीचे पाव्हुणे
मी देते फराळाचे
श्रीमंत माझे भाऊ
चमचे काढते चांदीचे

## शेतकरी

आम्ही दैवाचे दैवाचे शेतकरी
खाऊ सुखाने भाकरी
नको रे देवा कोणाच्या दारी

पाऊस ऊन थंडी
नाही अंधाराची भीती
जीवाची जरी माती माती
तरी दैवाचे दैवाचे शेतकरी

आमच्या मळ्यात नित्य चालूच मोट
आम्हा शेतकऱ्याचं आहे त्यावर पोट

झाल्या धस-काशा-कुंदा
त्याला साहाय्य गोविंदा
नको भलत्याच छंदा

खाऊ सुखाने भाकरी
आम्ही दैवाचे शेतकरी

# सूर्य–चंद्र

सूर्य सोडतो बाण
सोडतो चंद्रावर
सोडतो चंद्रावर
डोळ्या लागे बरोबर

खेळती दोघे बंधू
नाही जीवाला जपत
खेळता खेळता
ढगा आले ते लपत

लपता छपता झाले
दोघांचे भांडण
म्हणती एकमेकाला
मी पृथ्वीचा राजा-तू कुठला कोण ?

देवाने सांगितले
एक रात्री-एक दिवसाला
असा राजवटीचा
न्याय करूनी दिला

रजनीचे राज्य चंद्राला मिळाले
उषेच्या भाली सूर्य विराजले

# एखाद्याचं नशीब

श्रीमंताच्या पेटीला
पैशाचा झाला भार
एखाद्याच्या नशिबी
भाकरीची मारामार

एखाद्याच्या नशिबी
चैनीला कमी पडेना
दुसऱ्याच्या पोटाला
न अन्न, कपड्याची दैना

एकाला लागे ऊन
खडे टोचती पायाला
दुसऱ्याला नाही घास
पाणी वाहे डोळ्याला

श्रीमंती जेवण
हात तुपाने भिजले
गरिबाचे नशीब
सारा जन्म निजलेले

एखाद्याचे नशीब
जन्म उपाशी मर
कोणाच्या नशीबी
कपडे भर जर

एखाद्याचे नशिबी
तुपाने भरले द्रोण
दुसऱ्याला मिळे भाकरी
तिने न भरे मन

सर्व सारखे दैवाचे
नाही झाले निर्माण
नाही कुणाला भाकरी
कुणाला ना कशाची वाण

## सौभाग्य लेणं

शेरभर सोनं
खरं नको मला
सौभाग्य लेणं
असावं कुंकू कपाळाला

शेरभर सोनं
काय करता सोन्याला
पूर्ण आयुष्य मागावं
शेजच्या धन्याला

शेरभर सोनं
सोन्याला नाही मोल
जाते वाण्याच्या दुकानी
म्हणते, सव्वाशेर कुंकू तोल

जावे वाण्याच्या दुकानी
विचारतो वाणी बुवा
नको मला दुसरे काही
कुंकूच दाखवा

जावे वाण्याच्या दुकानी
सामान आलं नवं नवं
कुंकूच हवं मला
ते सारं बाजूला ठेव

कितीही असो दागिने
नाही भूषण त्याचे
जन्मभर कुंकू
लाभावे ह्या कपाळाचे

दागिने दागिने
नको दागिन्यांचा ढीग
लावा कपाळाला कुंकू
द्या करंड्याला शीग

दागिना दागिना
नको दागिना कोणता
कुंकवाचं भूषण
हेच खरं जाणता

नको हो पैठणी
नको मला शालू शेले
कपाळ असो माझे
कुंकवाने भरलेले

नको मज बिंदी
नको चंद्रहार
पुरे एक अलंकार
मंगळसूत्र

शेरभर सोनं
    नाही त्या सोन्याला किंमत
एका पती -- जीवावर
    मला जगण्याची हिंमत

दागिना मागते
    एक तुम्हापाशी
जन्मोजन्मी ठेवा
    दासीला या पायापाशी

देशील रे देवा
    देशील ते थोडे
मी मागते
    हळदी कुंकू राखोडे

# लाडकी लेक

माडीवरती माडी
    माडी उंच ही वाडाची
माडीवर उभी
    माझी लेक ही लाडाची

ताई चालते घरात
    चाळ वाजती छुनंऽ छुनंऽ
काम करिता करिता
    रमते माझे मन

लेक आली लग्नाला
    नीट पाहा नं घराणं
पाणी भरीन माझी बाई
    रेशमी दोरानं

द्या माझ्या लाडकीला
    घर भरल्या वैभवानं
तिच्या मना समाधान
    शेजीच्या वरानं

श्रीमंताच्या घरची
    माझ्या लेकीला मागणी
रूप गोरं भरार
    तिला दृष्ट लागेल झणी

बाई तुझ्या नशिबाने
लाभले मोठ्ठे घरंदाज
जावाई मोती---दाणा
हिरकणीवर साज

सासरी जाते लाडकी लेक
मी काय काय देऊ
गाडी भरली ओझ्याने
आता कितीतरी ठेवू

माझ्या लाडकीला कुणी
सासरवास नका करू
माझ्या पोटच्या गोळ्याला
नका अंतर हो देवू

# लग्नाची वरात

बाळ माझा नवरदेव
　　सग्या-सोयऱ्यात उभा
मोत्याच्या मुगुटाची
　　त्याच्या डोईवर शोभा

घोडा सजला साजाने
　　लखलखतो नटतो
जुंपला रथाला
　　बाळ नवरदेव बसतो

रथाच्या या घोड्याचे
　　लाल रेशमाचे दोर
वरातीच्या वेळेला
　　पाऊल पडे तालावर

नवरा नवरीचा जोडा
　　जसा हिरा-हिरकणी
रस्त्या माड्यावर लोक
　　मी आनंदले मनी

# फॅशन

मी पाहाते आपल्या
फॅशनचा थाट
गळ्यात नको पोथ
बीना बांगडीचे हात

नव्या फॅशनचे नखरे
घडी घडी बदलती
ऑफिसच्या वेळेला
नवरे उपाशीच निघती

हवी पोमेट पावडर
मारती कागदावर कीरा
स्वयंपाक करिती असा
नाही येत शीरा

नटण्या-थटण्याचीच सदा
धुंदी असे डोळ्यात
भरता येईना मग
पुरण कणकी गोळ्यात

आणि मिजासपणा असा
आणा हॉटेलचा खाऊ
किती होईना बील
पुढे आपण देऊ

रंगी बेरंगी कपडे
धुण्या ढीग साबण सोडा
बीलं देता देता
खिसा पडतो लंगडा

खर्च अव्वा सव्वा
आणि अशी महागाई
तरी मोटारीचे चोचले
मग चालती पायी

# फाजील लाडावलेली मुलगी

बाबा मला द्या नं
    नको दीर जेठ सासूं
गप्पा गोष्टी करून
    मग आम्ही हासूं

बाबा मला द्या नं
    नको तोही सासरा
म्हाताऱ्या माणसाचा
    सदा चहाचाच पसारा

बाबा मला द्या नं
    नसावी ती नणंद
हिंडेल फिरेल मी बाहेर
    करीन पुरे छंद

बाबा मला द्या नं
    पहा मालक सोपा-सापा
नको त्याचा धाक
    काढीन मस्त झोपा

# देव होऊनीया आला

प्रल्हादाच्या पाठीवर
दिला हत्तीने पाय
इतके करूनही त्याचे
झाले तरी काय

प्रल्हादाच्या बापाने
लाथ खांबाला मारली
देव नरसिंह झाले
त्याची बोबडी वळली

ठेवली कढई तेलाची
खाली पेटवली चूल
त्यात प्रल्हादाच्या देहाचे
झाले कमळाचे फूल

दिले आगीत लोटून
त्याने भक्त प्रल्हादाला
देह नाहीच जळाला
देव होऊनिया आला

# केव्हा पाहीन बाई

संध्याकाळ झाली
    आशा लागली घराची
केव्हा पाहीन बाई
    मुर्ती केशवाची।

परडी भरून फूलं
    पारिजातकाचे वर
आली दर्शनाला
    खूष झाले मुरलीधर

रक्ताचं केलं तेल
    कातडीची वात
नित्य प्रकाश ठेवा
    देवा माझ्या हृदयात

केवढे झाले हाल
    मग दिले त्याला पत्र
पती नाही माझे घरी
    नित्य होती ओले नेत्र

अति झाले हाल
    ईश्वराला केला तार
'येईल सोन्याचा दिवस'
    आले पत्राला उत्तर

# आई

सणामध्ये सण
आहे दिवाळी दसरा
आईच्या मायेचा
खरं जीवाला आसरा

आई तुझी माया
मऊ मऊ लोणी
प्रेमाची पाखर आणि
गोड गोड वाणी

केवढे गणगोत भोवती
किती भरली दुनिया
आई किती का मारेना
तरी म्हणेल सोनिया

आई तुझी माया
जशी दुधावरची साय
तुझ्या हातच्या अन्नाला
अमृताची चव

आई तुझी माया
आंब्याचे अमृत फळ
दुसऱ्याचे बोलणे
वरून बडबड

आई तुझी माया
    तू धरते पोटाशी
परक्याची माया
    आहे फुकट ओठाशी

घातला दोर पोव्हरा
    पाणी नाही विहिरीत
तशी आईविना कुणाच्या
    मनी नाही प्रीत

तिन्ही सांजा झाल्यावर
    गाय हंबरून आवाज
केव्हा सोडतील पाही
    तान्हं वासरू माझं

जंगलच्या पाखरानं
    करावी आशा प्रेमाची
आई येताच उडून
    पाखर घाली प्रेमाची

आईविना प्रेम
    असते उन्हाळ्याचे फुफ्फूट
वरवर सफाई
    आतून भले मोठे कपट

आईविना माया
    काचाचे काचकोर
आईची माया
    साऱ्या जगामध्ये थोर

आई तुझे प्रेम
    नाही विसरले जात
परक्याची माया
    आहे डावा हात

आई तुझे प्रेम
    निर्मल गंगेचं पाणी
तुझ्याविना मूलं
    होती केविलवाणी

आईच्या कासेखाली
    वासरू प्रफुल्लित
विना मायचं लेकरू
    रडते गलीत

विना आईच्या लेकराला
    खाण्या कैना-कोंडा
एखादं चुकलं काम
    सारे उचलती धोंडा

बिना आईचं लेकरूं
    तडफडती मासोळी
लाथा बुक्क्या खाऊन
    खाऊन, दिसते पासोळी

आई तुझे प्रेम
    जसे आकाशाचा घेर
जिथे राहीन मी
    तिथे कृपा मजवर

आई तुझे प्रेम
    मला नखभरही पुरे
नको हवेल्या माड्या
    झोपडीतही आनंदी वारे

# विठ्ठल माझा बाप आई रखुमाई

आषाढी कार्तिकीला
गजबजले पंढरपूर
'जय-हारी-विठ्ठल' चे
घुमती गजर

गर्दीला सारूनी
आली मी घाई घाई
विठ्ठल माझा बाप
आई रखुमाई

हा माझा संसार
हे माझे घर
हे माझे गुरू
हे माझे ईश्वर

दळण मी दळते
गीत गायन देवाला
वरण्यापरत माझ्या
हर्ष या जीवाला

## कामामध्ये काम मुखामध्ये राम

हे नको ते नको
    तू बोलतो कसा
देव पाठवितो
    ज्याचा त्याचा हिस्सा

ज्याचा त्याचा हिस्सा
    देव त्याला देईल
कोणाला नको दुःख
    हे कसे चालेल

खरे तर असावा
    पांडुरंगावर भाव
अंतःकाळच्या वेळी
    म्हणा वासुदेव

हातानी करावे काम
    तोंडानी म्हणावे राम
असे होऊ नये
    केले नाही चार धाम

कामामध्ये काम
    मुखामध्ये राम
लांब नाही कुठे तो
    आहे पाठीजवळ

# रंग भरली अंगणी

आषाढी कार्तिकी
एकादशी आली
माझ्या अंगणात
संतांची दाटी झाली

साधु - संताची संगत
कृपा मजवरी
नाही कशाला वाण
आनंद माझ्या उरी

संत बसले भोजनाला
श्लोक पडले कानी
तुम्ही निश्चिंत जेवा
रंग भरला अंगणी

# एक नारायण तेज पृथ्वीला

जन्माला यावा पुत्र
असावा असा गुंडा
पुत्र असावा गुंडा
त्याचा तिन्ही लोकी झेंडा

एक नारायण
तेज पृथ्वीला
बलवान हनुमंताचा
आनंद अंजनीला

माझा बाळ वासुदेव
संघाचा पुढारी
पुढे पुढे चला
म्हणतो अशी थोरी

लाडक्या या बाळाला
नका करू वसवस
कृष्णासारखं त्याचं
रूप दिसते गोंडस

नका करू वणवण
जाळू नका मनाला
फार दिवसांनी फांदी
फुटली झाडाला

# तुका रमतो कीर्तनी

प्रश्न नाही जातीचा
तो होता कोण
नव्हता पैसा धन
शुद्ध त्याचे मन

शिवाजी पाठवितो
धनसंपत्ती त्याच्या घरी
तुका विठोबाचा भुका
नको जडजवाहिरी

उठले सुटले त्याचे
विठोबाशी ध्यान
जिजाई म्हणे काही
घरचे पहा नं

कान बहिरे होताती
हातापायाला ना गती
तुका रमतो कीर्तनी
मुखी अभंग झरती!

# विरोध—भक्ती

काय सांगू देवा विठ्या
आला काय आळ
तुम्ही बसता तिकडे
कसे सांभाळू मुलंबाळं

अरे मेल्या काळ्या
तू कानाडोळा केला
मी आहे पतिव्रता
नाही माझा जीव गेला

आषाढी कार्तिकी
पंढरपुरा गर्दी दाटली
दर्शन कसे होईल
पाहाते मी वाट्ुली

गर्दीला लोटुनी
आली मी धाई धाई
विठ्ठल माझा बाप
रुक्मिणी माझी आई

# अंगाई—गीत

ये ग ये ग गाई
    गाईचं दूध गोड फार
बाळ राहीना कडेवर
    लावा वासरू काढा धार

ये ग ये ग गाई
    दुधाची मी वाट पाही
तुझ्या दुधावाचूनी
    बाळ राहात नाही

वाट मी पाही
    गाई आल्या चरून
लावा कासेल्या वासरं
    द्या चरवी भरून

तिन्ही सांजा झाल्या
    गाई गोठ्या आल्या
तान्हा वासराच्या
    दोर - गाठा सुटल्या

तनकन् कुदून
    गेले वासरू दवडून
गाईचे स्तन
    गेले पान्ह्याने भरून

गवळी काढतो दूध
नाही मुलांना धीर
दूध पिण्यासाठी त्यांचं
मन झालं अधीर

# स्त्री-जन्मा तुझी कहाणी

लक्ष्मीचा जन्म बघा
कठीण हा फार
सत्शील मुलीवर
दुष्टाने केला बलात्कार

बलात्कार झाला
कारण हे घडलं
दिवशी एका बाळ
जन्माला आलं

लग्नाआधी झाले
भाऊ म्हणे हे काय
काळे लागले तोंडाला
टाकू कोठे मी पाय

तिने घेतली शिक्षा
भावाचे संकट जाणून
गंगामाईत घेतलं
बाळासह वाहून

स्त्री जन्माची अशी
करुण कहाणी
हृदयी अमृत
परी नयनी पाणी

# भाऊबीज

सणामध्ये सण
शुभ दिवाळीचा दिवा
भाऊबीजेचा सण
केव्हा येशील रे भावा

भाऊबीजेचा सण
भाऊला माझ्या झीज
त्याच्या विना मोठं
कोण गोत मज

तुझ्या शेता आलं पीक
मला उल्हास वाटला
भाऊ माझा श्रीमंत
खण जरीचा फाटला

शेतीचा माल किती
खंड्या किती मण
मी आशा करिते
एक दिवाळीचा खण

दिवाळी येईन
मी माहेरी जाईन
चोळी बांगडी घेऊन
घास अमृताचा खाईन

# स्त्री-जन्मा तुझी कहाणी

लक्ष्मीचा जन्म बघा
कठीण हा फार
सत्शील मुलीवर
दुष्टाने केला बलात्कार

बलात्कार झाला
कारण हे घडलं
दिवशी एका बाळ
जन्माला आलं

लग्नाआधी झाले
भाऊ म्हणे हे काय
काळे लागले तोंडाला
टाकू कोठे मी पाय

तिने घेतली शिक्षा
भावाचे संकट जाणून
गंगामाईत घेतलं
बाळासह वाहून

स्त्री जन्माची अशी
करुण कहाणी
हृदयी अमृत
परी नयनी पाणी

# भाऊबीज

सणामध्ये सण
    शुभ दिवाळीचा दिवा
भाऊबीजेचा सण
    केव्हा येशील रे भावा

भाऊबीजेचा सण
    भाऊला माझ्या झीज
त्याच्या विना मोठं
    कोण गोत मज

तुझ्या शेता आलं पीक
    मला उल्हास वाटला
भाऊ माझा श्रीमंत
    खण जरीचा फाटला

शेतीचा माल किती
    खंड्या किती मण
मी आशा करिते
    एक दिवाळीचा खण

दिवाळी येईन
    मी माहेरी जाईन
चोळी बांगडी घेऊन
    घास अमृताचा खाईन

# कृतघ्न

अरे दुखले तुझे नख
झोप नाही खाटीवर
आईला झाले दुःख
हात फिरवी पाठीवर

उपाशी राहून तुला
दिला पैसा शिक्षणाला
लहानाचा मोठा केला
आता साहेब झाला

बापाला म्हणतो नोकर
आई मोलकरीण
नि कशाला आले तुम्ही
इथे बिना कामानं

नादारी लागली धड
भरेना आमचे पोट
अरे शेत विकून शिकविले
तू झाला हलकट

# अंथरुणाच्या बाहेरी

अरे तरुणपणातल्या धुंदीने
    केला तू नाश
कर्ज झाले भार
    तुटून पडले आकाश

पैशाच्या गुर्मीत
    कसे ऐटीत चालता
कर्जाच्या ओझ्यानं
    माना खालीच घालता

करावे कोणते काम
    आधीच उघडावे डोळे
ना तरी शेवटी
    गटारात लोळे

अंथरुणाच्या बाहेरी
    नको पाय पसारा
कामी पडेना रे बाबा
    श्रीमंताचाही आसरा

कर्जानं जाते पाणी
    होतो दीनवाणी
मग कोण म्हणतो
    'या बसा' घ्या चहापाणी

# अरे संसार संसार

सुखाचे दिवस
    जाती भराभर
दुःखाचे कढ
    सारखा डोक्याला भार

सुखाचे दिवस
    नाही आठवत मना
दुःखाचे मात्र
    काढणे सोसेना

सुखाच्या वेळी
    सारं गणगोत
दुःखाच्या वेळी
    नाही मुळी फुरसत

संसार संसार
    संसारात नाही सार
संसाराचा व्याप
    डोईवर झाला भार

संसारात येऊन
    नीट करा घेणं - देणं
अंतःकाळच्या वेळी
    नाही काहीच नेणं

संसाराचा व्याप
नाही जराही चैन
कष्ट करता करता
होते जीवाची दैन

अति करावे कष्ट
हाडांचा होतो चुरा
संसाराचा व्याप
आहे असाच खरा

आज आहे उद्या नाही
संसार हो कसा
आली अंतःकाळची वेळ
मग सारे गप्प बसा

संसार म्हणता संसार
संसार नाही खरा
अंःतकाळी सारे सोडून
यमाची वाट धरा

# तेला वाचून वातीला

गाढवाला दिला गूळ
    त्याला आवडते धूळ
म्हशीची जात
    बघा मोडते कूड

गूळ ठेविला पुढे
    गाढव कोठे वळे
त्याचे लक्ष
    भलतीच कडे

मोती माकडाच्या हाती
    त्याने केली माती
मोती ओळखाया पाहिजे
    जोहऱ्याच्या जाती

हिऱ्याचा खडा
    मूर्ख काय जाणे
जातो वाण्याघरी
    म्हणे द्या चार आणे

सज्जनाचं मोल
    दुर्जन काय जाणेल
तेला वाचून वातीला
    ज्योत कशी लागेल

# मोट—बारी

माझे पती आहे
संसारी भारी
म्हणती हाणतो मोट
तू धर बारी

मोट हाणता हाणता
सूर्य झाला काना
किती वेळ झाला
आता न्याहरी आणा

अग कशाला आता लाज
खाऊ बरोबर भाकरी
आधी होती बॅरिस्टरी
आता शेताची चाकरी

काय न्याहरी झाली
द्यावी थोडी तंबाखू
थोडा वेळ जरा
आता अंग टाकू

उठावे चला पुनः
लागावे कामाला
हात लावतांना, हांक
मारावी रामाला

# अमृत - जेवू

भक्तिमध्ये भक्ती
पतिसेवा श्रेष्ठ
पति-चरणाची, तिच्या
डोळयांना वाट

पतिव्रता धर्म
आधी अन्न नको घेऊ
त्यांचे अगोदर, मग
आम्ही अमृत जेवू

पतिव्रता बाईचा
असावा हा भाव
तिच्या आयुष्याला मग
कशाची उणीव

लक्ष्मीच्या जन्माला
पतिव्रतेचे बळ
उगवलं चंदन
त्याचा सुटला परिमळ

खऱ्या चंदनाचा
लपेल का सुवास
सुवर्णाची थोरवी
पितळाला नाही खास

# सुवासिनीचे लेणे

सुवासिनीचे लेणे
पहिले कुंकू
जन्माला येऊनी
राज्य आपण जिंकू

सुवासिनीचे लेणे
दुसरे मंगळसूत्र
कृष्णासारखा असावा
माझा पुत्र

सुवासिनीचे लेणे
तिसरे हातभर चुडा
भ्रताराची सोबत
जन्मभर जोडा

सुवासिनीचे लेणे
चवथे नाकामध्ये नथ
नित्य असेच ठेवा
देवा, शेवटी द्या रथ

पाचवे लेणे, तिच्या
जोडवे पायात
राज्य भोगून या
संसारी करू मात

## वाळवंटी कीर्तनी

आषाढी कार्तिकी
    पंढरीला जावं
खरा असावा
    विठोबाघरी भाव

टाळ मृदंगाचा नाद
    ऐकावा कानी
बहु नाचावे गावे
    वाळवंटी कीर्तनी

देवाधर्मांची कशाला
    करावी गणती
जिथे जावे तिथे
    संतांच्या पंगती

दान धर्म करा
    नका सांगू वानून
तुमचे माझे मन
    देव आहे जाणून

देव धर्म सारे
    एक मीच केले
मन नाही शुद्ध
    सारे वाया गेले

आषाढी कार्तिकीला
नका टाळाटाळ करू
सोडा संसार धंदा
वाट पंढरीची धरू

आषाढी कार्तिकी
पंढरपूरला दाटी झाली
विठोबा रखुमाईच्या
दर्शनाला मी आली

हात जोडते मी देवा
कृपा असू द्या पामरा
माझ्या अंगणात तुम्ही
नित्य रथ उभा करा

पांडुरंगाची सेवा
असावी माझ्या नशिबी
माझ्या अंगणात नित्य
लक्ष्मी आहे उभी

झोप लागली एकदा
दारी नारायण आले
स्वप्न पडलं
संत सारे गोळा झाले

दिंडी थांबली अंगणी
किती आनंदले मनी
संत नाचती भजनी
पालखी खांद्या घेऊनी

स्वप्नामधल्या पालखीत
झाले विठोबा दर्शन
घरी संतांचे चरण
मन झाले समाधान

देवा तुझं नाव
खडीसाखरेचे खडे
तुझ्या दर्शनासाठी
मी मासोळी तडफडे

## आसरा – रामाचा

पैसा दागिना हवा
    तो कुठवरी कामाचा
नरजन्माला एक
    आसरा रामाचा

पहाटे उठोनी लागावे
    आपुल्या नित्य कामा
कामामध्ये काम
    मुखी रामराम म्हणा

मुखी म्हणा रामराम
    त्याला कवडी खर्च नाही
भाराभर ओझे
    त्याचे डोईवर नाही

हरी नामाची जरा
    असू द्या न गोडी
अंतःकाळच्या वेळी
    त्याला पांडुरंगाची जोडी

संसाराची माया
    देते सुख वरवरी
खरे समाधान
    मुखी पांडुरंग हरी

काय कामाच्या वीटा
    दूर डोंगरी सोन्याच्या
राशी पडल्या माझ्या
    घरी राम नामाच्या

नरदेहाचे सार्थक
    करा नामस्मरण
चंदनी लाकडावर जाऊ
    पेटेल सरण

जन्माला येऊनी
    नाही विसरले तुला
अंतःकाळच्या वेळेसाठी
    मागणे विश्रांतीला

# दळण दळते दळते

दळण दळते गाते
गाणे मी देवाचे
माझ्याजवळी आले
पांडुरंग केव्हाचे

पांडुरंग माझा बाप
रखुमाई माऊली
संत गाती अभंग
नाचती पाऊली

विठोबा रखुमाईची
मी करिते सेवा
त्याचे नाव घेता
गोड वाटे जीवा

दळण दळते दळते
ओवी देवाला गाते
माझ्या घराला पाव्हुणी
देवी लक्ष्मीबाई येते

पहाटे उठूनी
आटोपते मी काम
मुखी रामनाम
करिते देवीला वंदन

# तोवरी त्याचा ओढा

मिळे पर पैसा
गोड गोड गोष्टी कशा
आता कोण हाणेल
त्याच्या अंगावरच्या माशा

पर पैशाचा खाऊ
लागला गोड गोड
जीव थकल्यावरी
केली त्याशी ताटातूट

जोवरी असे घोडा
तोवरी त्याचा ओढा
जीव थकल्यावरी
मग सोबत तोडा

अरे दुसऱ्याचे धन
त्यावर दृष्टी नाही बरी
शेवटच्या वेळी ओवाळणी
एका पैशाचीच करी

# सासुरवास

दळण दळता दुखले
    लाडकीचे हात
झाली बाई कमाल
    सासुरवासाची मात

थोडे सांडले-उंडले
    कामाची तू लठ्ठी
सांगून दिली चुगली
    नवरा उचलतो काठी

दळण दळता दळता
    लागला जरी खडा
नणंदेच्या चुगल्या
    नवरा उचलतो जोडा

काम हातचे जरा
    द्यावे सोडून
सासू मध्ये मध्ये
    जवळ पाहाते येऊन

सासूचा सासरवास
    भोगला लाडकीनं
घराबाहेर गलीनं
    चाले गालात हासून

# तुकोबा

हातामध्ये वीणा
    कपाळी उभा गंध
अभंग गाण्याचा
    तुकोबाला छंद

हातामध्ये वीणा
    डोईवर पागोटी
गाथ्याचे पुस्तक
    नित्य हवे काखोटी

हातामध्ये वीणा
    अंगी बाराबंदी
कंठी तुळशीमाळा
    अभंगवाणी तोंडी

एका हाती वीणा
    दुसऱ्याला चिपोळी
कीर्तनाच्या वेळेला
    धुंद नाचतो संतगडी

# गांधीजी

महात्मा गांधीजी
त्यांची जगभर ख्याती
भारत मातेसाठी
जाळली अंगकाठी

गांधीजींना मारून
धर्म केला भ्रष्ट
म्हणे मी ब्राम्हण
माझा धर्म श्रेष्ठ

म्हणे धर्म श्रेष्ठ
मी ब्राम्हण मानव्
धर्म सोडल्यावर
काय करील जानवं

तुझ्या धर्माचा तूच
केला सर्व नाश
धर्माला सोडूनी
झाला विकारवश

गांधीजींचा आत्मा
होता किती शुद्ध
घेतले स्वराज्य
करू दिले नाही युद्ध

# भूमिवरी निजावे पांघरावे आकाश

हिरे आणि माणिक
  याचा झाला ढीग
जीवाला नाही सुख
  काय त्याचा उपयोग

नको सकू बहीण
  नको गुरू बहीण
गोड शब्दांची आठवण
  जगी मी ठेवीन

नको कुणाची मोटर
  नको कुणाचे विमान
आपल्या गुणांनी व्हावे
  सूर्य किरणासमान

भूमिवरी निजावे
  पांघरावे आकाश
हृदयातल्या ज्योतीने
  पाडावा प्रकाश

दिसावे सुंदर
  तसा असावा गुण
गंगेसारखे निर्मळ
  ठेवावे मन

जन्माला येऊनी
चंदनासारखे झिजावे
अंतःकाळच्या अस्तीला
गंगेमध्ये टाकावे

ग्रंथ संग्रहालय ठाणे
२२२९५
दा. क्र. काव्य
२३४२
ग्रंथ शाखा

# फुलली जशी फुझालंडं

घरादाराला आहे
शोभा लेकरांची
जशी गोठ्याला
गाई वासरांची

संसाराला आनंद
घरभर मुलंबाळं
बागबगीच्यात फुलली
जशी फुलंझाडं

देवा जोडिले हात
आशीर्वाद लाभले
हिरे माणिक माझ्या
महाली विराजले

# नुसते टोकर

हरामाची इस्टेटं
दीड दिवस राज भोगा
अरे काही दिवसांनी
मुलं मागतात जोगा

चोरी करता करता
तुला पडली घटणी
देवाच्या दरबारी तू
येशील मग वठणी

दुर्जनाच्या कृतीने
भरा पैशाचे पोते
चंदनाची सुगंधी
त्याला थोडीच येते

बघा करिती चोऱ्या
नि सजविती घरा
यमाच्या दरबारात
द्यावा लागेल जबाब खरा

सज्जन पाहतो शील
तुला केवळ पैसा
पैशासाठी नको त्याला
कुणाचा कलिजा

चोराच्या धनाला
मारावी ठोकर
शेवटी धन नको, तर
नुसते टोकर

# म्हणे विचार करतो

आरतीला पाव आणा
    तो जीवावर आला
तमाशाला गेला
    नोटांचा चुरा झाला

कीर्तनाला जा ना
    म्हणे विचार करतो
नवा सिनेमा लागला
    की गुलू गुलू बोलतो

# चमत्कार झाला

सकाळ संध्याकाळ
    घरचाच व्याप
माझ्याविना नाही
    कोणते काम भागत

कोण उपाशी-जेवले
    सर्व काळजी त्याला
देवधर्म सोडून
    असा भारवाही झाला

एकदा असे झाले
    हरिदास आला
लोक म्हणती गृहस्थाला
    चल कीर्तनाला

कीर्तनाला चल
    बोलवाया जाती
घर कसे सोडू
    वळेना त्याची मती

मग हरिदास आला
    फार आग्रह केला
तरीही म्हणाला
    काम फार मला

बुवाने पुनः पुनः
आग्रह त्याला केला
मग शेवटी कसाबसा
कीर्तनी बसला

थोडी कथा झाली
आता उठू लागला
बुवाने मग त्याला
चांगला दाटून दिला

कथा संपल्यावर
सारे लोक गेले
गृहस्थ मात्र तिथे
उभेच राहिले

हरिदासबुवांनी त्याला
एक प्रयोग सांगितला
घरच्या मंडळींची
परीक्षा पाहायला

गृहस्थ गेला घरी
म्हणे पोट दुखते भारी
लोळून गडबड केली
तडफड सारी

असे कसे झाले
सूळ निघाला पोटात
येऊ देईना जवळ
लावू देईना कुणा हात

मग तिथे हरिदास
बुवा निघून आला
उपाय सांगितला
नि चमत्कार झाला

दिले बुवाने तीर्थ
म्हणे हा राहील जीवंत
तीर्थ घेणाराला मात्र
द्यावा लागेल अंत

ज्या ज्या सर्वांची
काळजी गृहस्थाला
दूर दूर पळाले
घेऊन आपल्या जीवाला

मग गृहस्थाला
अनुभव खरा आला
शेवटच्या क्षणाला
कोण येईना साहाय्याला

सुखाच्या क्षणाला
करिती वरवर
अंतःकाळच्या वेळी
पळाले भराभर

त्या दिवसापासून
देवधर्मी लागला
हरिदास बुवाला
त्याचा आनंद झाला

## पोळा

बारा महिने बैल
    काम करता भारी
पोळयाच्या सणाला
    मारू नका आरी

बाराही महिने
    बैला होते मारहाण
सजवू पोळयाला
    डोई बाशिंग बांधून

टाकला चारा तेवढ्यावर
    खाऊन उगा राही
सोडता खुंट्याचा
    जूं खांद्यावर वाही

पोळयाचा दिवस
    पुरणपोळीचा सण
बैलाला खाऊ घालू
    करूं शांतवन

पोळयाच्या दिवसाला
    देवाचा त्याला मान
करूं त्याची पूजा
    आम्ही मनोमन

# कोण लावील ठिगळ

चिंतन करे मी नाथा
सख्या भगवंताचे
नेत्री झरती माझ्या
पाझर डोंगराचे

असं पाप झालं
पृथ्वीला झालं ओझं
मुळी नाही दया माया
कोणी नाही तुझं

गाडी स्टेशनात उभी
पाणी दोन आणे पेला
लबाड करती मजा
सज्जन हा मेला

कडब्याचा भाव
रुपये शेकडा साठ
गायी गुरांच्या पोटाला
धड जाईना घोट

आकाश फाटलं
कोण लावील ठिगळ
किती वाहती नाथा
अश्रूधारांचे वघळ

कोसळे डोंगर
अंगा पडे धडाधड
निघावे बाहेर तरी
ऊन करे कडाकड

# धुंद तुझ्या डोळ्यांत

पाच सात तालाची
म्हणे हवेली माझी
वाटेने चालता
बोलायला नाही राजी

अरे धुंद तुझ्या डोळ्यात
किती आले गेले
ह्या संसाराचे, शेवटी
काय बरे केले

संपला पैसा तरी
नको करू उचल
बुडून जाईल नाव
काम हे फसल

# आली मोहरची गाडी

आला माहेरचा गडी
त्याला सांगते निरोप
फार दिवस जातात
तरी पत्र नाही येत

रात्रंदिवस मनाला
ध्यास आस लागते
पत्र आल्याविना मना
शांती कुठे लाभते

पत्र आलं भावाचं
दिवाळीला आहे यायचं
दळण दळते, दळते
आज मी गव्हाचं

भाऊबीजेच्या दिवशी
चंद्र पाहाते माडीवरून
रस्त्यानं येतांना
भाऊच दिसला दुरून

भाऊ आला थाटानं
त्याचं केलं मी पूजन
चांदीचे ताट-वाट्या
जेवायाला शिखरण

# आणि मग आकाशाला ढळढळा रडू आलं

दिली इस्टेट वाटून
    देशकार्याचा निर्धार
साऱ्या आयुष्यभर
    केले कष्ट अपार

नेहरूजींचे निधन
    झाली जगाची हानी
अंतःकाळीच्या वेळी
    दुःखाने हालली भूमी

नेहरूजींच्या बुद्धीला
    होते आकाशाचे बळ
आता सोडून गेल्यानं
    जगा लागली हळहळ

उगवला सूर्य जसा
    गेले खुलून आकाश
तसा नेहरूजींचा होता
    या भारती प्रकाश

वाटे भारताचं आता
    कसं ते होईल
आणि मग ढळढळा
    आकाशाला रडूं आलं

# उखाणे

शंकराची पूजा
　　गळ्या मोत्याचा सर
रावांचं नाव घेते
　　मी भराभर

पृथ्वीच्या प्रकाशाला
　　चंद्र-सूर्याची जोडी
रावांच्या नावावर
　　घालते हिऱ्याची कुडी

गंगेच्या काठावर
　　बांधला महाल सुंदर
राव असे मिळाले
　　आली नशीबाला बहार

माझ्या संसारात देवा
　　अमृताचा रस
हिऱ्या माणकांनी भरली
　　रावांनी माझी पस

हजार पाचशेचे मोती
　　माझ्या नथीला टीक
रावांच्या गुणाला खरी
　　किंमत अमोलिक

संक्रांतीचा सण
करिते मी थाटात
रावांचं नाव बाई
हळदीकुंकू माझ्या हातात

गौरीच्या पुढे
लाविल्या दीपज्योती
रावांचं नाव घेते
ओळखा गळ्यातील मोती

फूलबाग बगीचा
डोलतो लाहालाहा
राव दिम्माखात
रूप आरशात पहा

नवीन बंगल्यात
टांगला झोपाळा
रावांच्या कंठी
पहा रत्नांच्या माळा

दिल्ली मुंबईचा
सारखा असतो फेरा
रावांनी आणले पातळ
त्यात जरीच्या धारा

गळ्यातील मंगळसूत्राला
मोती लावले दुहेरी
रावांच्या गुणांचं
नवल करिती सगी-सोयरी

मेघ पाणी पिऊन
आकाश आले भरून
गरिबांची काम
राव देती मोफत करून

सूर्य चंद्राचे तेज
पृथ्वी प्रकाशाला
रावांचं राज्य बाई
लोकांचा न्याय झाला

अंधाऱ्या रात्री
शुक्रतारा विराजतो
राव बॅरिस्टर
खऱ्याचा न्याय होतो

एवढ्या दुनियेची
मला गोष्ट नको आणिक
रावांचं नाव मुखी
हिरा नको माणिक

# राव लवकर या घरी

बघा डाव आला रंगात
    टाकून द्या एक्का
रावांना म्हणते
    घरी यायला वेळ करु नका

डाव आला रंगात
    हवी केवळ दुरी
रावांना विनविते
    लवकर या घरी

तासामागे जाती तास
    टाका आता तीरी
अहो राव तुम्ही
    ऐका एक वेळ तरी

खेळतांना नसते भान
    टाकून द्या चवरी
रावांना मी सांगते
    इतरांची दृष्टी बावरी

असा जमला खेळ
    सोडून द्या पंजी
अन राव तुम्ही लवकर या
    थंड होते करंजी

त्यांनी सोडली छक्की
    घ्या हवी तरी
खेळ संपवून राव
    या तुम्ही घरी

खेळ आला रंगात
    टाकून द्या सत्ती
राव आता संपवा
    बाहेर उभा हत्ती

किती अडविता पानं
    टाकून द्या अष्टी
राव केव्हा येती
    वाट पाहून मी थकली

नवलीच्या सोबतीला
    नको का दहिल्या
राव तुम्हांसाठी
    किती, वेळा मी सोसल्या

खेळ रमला आता
    सोडा हुकमाचा गुलाम
रावांना म्हणते
    तुम्हाला माझा प्रणाम

पत्त्याच्या खेळात
    येऊ द्या राणी
राव संपवा लवकर
    मांडते पाटपाणी

राणीच्या शेजारी
ठेवून द्या राजाला
राव खेळ जिंकून
लवकर या घराला

## उखाणे – व्यक्तीच्या आडनावाला

साऱ्या पृथ्वीचा भार
सोसतो शेष
आता रावांचं नाव घेते
मंदीर गणेश

वेडे वाकडे शब्द
मनाचे भोळेभाळे साबडे
रावांचं नाव बाई
ऐका तुम्ही बोबडे

कोणाला नाही वाळा
कोणाच्या गळयात सरी
रावांचं नाव बाई
ऐका तुम्ही चौधरी

आकाशातील मेघ पहा
एक एक वितळे
रावांचं नाव बाई
ऐका हो चितळे

आपलं तुपलं काही नाही
हिशेब सारे वरचे
रावांचं नाव बाई
ऐका तुम्ही खरचे

बघा हिरव्या रानी
कशी बागडते हरणी
रावांचं नाव बाई
ऐका तुम्ही कुळकर्णी

कृष्णाची किती नावं
त्यात गोविंद माधव
रावांचं नाव बाई
ऐका तुम्ही जाधव

हवेल्या माड्या तुमचं गाव
दुरुनच खुलते
रावांचं नाव बाई
ऐका तुम्ही कोलते

नरदेहाचा करा उपयोग
तरीच काही मिळे
रावांचं नाव बाई
ऐका तुम्ही भिडे

कोणी बहु चतुर
कुणी मातीचेच गोळे
रावांचं नाव बाई
ऐका ना भोळे

कुणा घरी हिरे लाल
न कुणाला अन्नही जळके
रावांचं नाव बाई
ऐका तुम्ही फडके

# दाट झाडीमध्ये

नाथा, दाट झाडीमध्ये
मज नव्हता जिव्हाळा
जिकडे पाहावे तिकडे
साराच उन्हाळा

दाट झाडी, अती ऊन
नसे पाण्याचा थेंब
घराण्याच्या नावासाठी
मी केली नाही बोंब

नाही कुठे गेली-आली
कुणा बोल नाही दिला
काम कष्टामध्यें,
सारा जन्म घरी गेला

दाट झाडीमध्यें
झिजवली अंगकाठी
झाडी राक्षस पाठी,
सहन केले शीलासाठी

नाथा झाडीतली वेळ,
एक एक कशी गेली
मायेवाचून तुरटीची
लाही लाही झाली

झाडी शील-दिलासाठी
देहाची केली होळी
राक्षसाचे शब्द
लागे बंदुकीची गोळी

राक्षसांच्या शब्दांनी
हृदय पोखरलं
वखराच्या पासीने
शेत जणू वखरलं

क्षण एकही झाडीत,
शांतता नव्हती
मना वाटे नाथा
जशी होळी सभोवती

नाथा हाल कष्टामध्यें
देहाची झाली हाडं
रंधा फिरवुनी खासले
वाळले लाकूड

दाट झाडीमध्यें होता
नित्याचा धंदा
माझ्या हाडावरी जसा
फिरवती रंधा

दाट झाडीमध्यें नाथा
पंख टाकले तोडून
नावासाठी घराण्याच्या
बसले मूग गिळून

नाथा झाडी हाल कष्टानं
गेली मी कावरून
कुठे सांगू मी उमाळा
मन घेई आवरून

झाडी बैलाची गत
भर वाहाण्या हजर
उमाळा ऐकण्याला
कोणा फुटेना पाझर

शब्द मी बोलेना
जीभ जशी जखडली
नव्हता मायेचा पदर
मी थंडीने आखडली

मी सांगे उमाळा
हासुनी जीरवत
मायेवाचूनी, माझ्या छाती
किक फिरवत

नाथा दाट झाडीमध्ये
जीवंत यमपुरी
असं वाटे, माझे पती
येतील कधी घरी

एक एक क्षण
मला होई तरी कसं
उसाच्या चरक्यात
जसा काढतात रस

शेजारीण म्हणे, तूं
काही तरी झगड
मी कुठे होती पण
तिच्यासारखी दुधड

नाथा दाट झाडीमध्ये
केलं कडकडीत तप
केव्हा येतील माझे पती
मनी हाच होता जप

नाथा झाडीमध्यें
कडकडीत उपोषण
झाडी होते राक्षस
त्यांचे निर्दयी मन

झाडीतल्या उपासाला
नाही फराळ की पाणी
राक्षसांच्या मुखातून
नसे कधी गोड वाणी

नाथा झाडी हालकष्ट
मी बसे सोसत
बघा मूर्खांचे शब्द
जसे काटे बोचत

कोणत्याही कामाला
करेना मी हयगय
नाथा दाट झाडीमध्यें
भर वाहिले मी लय

अशी कशी दाट झाडी
    पाय न टाकाये
पायी मोडले काटे
    न काढाया वाकाये

मी सांगे उमाळा
    खिदडून काढती दात
माझी रडत जाय रात
    मायेची नव्हती साथ

दाट झाडी नसे झोप
    वाटे डोळ्या गेली रेती
मायेच्या वाचून
    माझी होती अशी गती

झाडी नसे सोय
    वाटे डोळ्या गेला धूर
मायेवाचून हळहळ
    नित्य नेत्री अश्रूपूर

पाण्यावाचूनी मासोळी
    उन्हा लोळे रेतीवर
खरं लक्ष्मीचा जन्म
    पतीवर निर्भर

उमाळ्याचा शब्द
    झाडी एक एक आटवला
जात्यासारखा उभा
    माझा देह टाकवला

शब्द बाण सुटत
नसा नसा तुटत
सुरूंग लावून जसे
गोटे हाडाचे फुटत

झाडी भर वाहिले
ओठ फेसाळले
बिना पक्षिणीचे पिलू
भूमी घोसाळले

नाथा मज वाटे
तुम्ही कधी याल
बिना गुन्ह्यानं होती
मी उलटी टांगेल

नाथ पराया देशात
वर्ष गेले पाच
झाडी राक्षसांचे बोल
माझ्या अंगी कोरं-काचं

अति येई उमाळा
बघा होता पेवभर
माझ्या मनी भरवसा
एका पांडुरंगावर

आज लागली झडी
एक झाले नदी नाले
जिव्हाळयाच्या आठवणी
डोळे भरू आले

देवाला हात जोडे
    अंगणी उभी राहे
केव्हा येतील पती
    मोरावानी वाट पाहे

दाट झाडी मध्ये
    देह सारखा झिजवला
पती आले घरी
    दिन सोन्याचा उगवला

देवाच्या देणगीने
    हे ठेविले लिहून
नाथ - ईश्वराकडे
    आली समाचार घेऊन

# पती हेचि देव

संसाराला भूषण
सर्व काही पतीचं
तोंडावरी तेज
जसं नाकातल्या नथीचं

तुमचे नारायणा
उपकार झाले फार
असे लाभले पती
सोने नको भारोभार

तुम्ही नारायणा
कुंकवाला ठेवा तेज
पतीच्या राज्याचं
खरं भूषण आहे मज

सकाळी उठून,
हात जोडते मी देवा
माझ्या कुंकवाला
भरदार तेज ठेवा

पती झोपाळ्यावर
दिसतात जसे राजे
हात जोडते देवाला
काळीज खुलते माझे

माझ्या प्रपंचात
    खरं अमृताचा रस
हळदी कुंकवाने
    माझी भरलेली पस

कोणाच्या पैशाचा
    दागिन्याचा नाही हेवा
पतीला दीर्घायुष्य
    मागते मी देवा

पतीच्या सुख दुःखाला
    होत मी वाटेकरी
सार्थक जन्माचे होईल
    ईश्वराच्या दारी

लक्ष्मीच्या जन्माला
    असावी पती सेवा
मनोभावानं पूजावं
    याच महादेवा

सांगते नारायणा
    शुद्ध माझे मन
भर्ताराच्या जीवावर
    मी आहे अवलंबून

माझ्या पतीची
    कोण करीन बरोबरी
पदोपदी लोक
    गाती त्यांची थोरी

आंघोळ करुन घेते
    पतीचा नमस्कार
कोठे नाही जाणे-येणे
    हेच पुण्य मला फार

नको कुठे जाणे-येणे
    पती हेची देव
मनापासूनी खरा
    असावा हाच भाव

देवा जोडूनी हात
    मी करिते विनंती
जन्मोजन्मासाठी
    मागते हेच पती

माझे भर्तार जसे
    सद्‌गुणांचे सागर
जेथे जातील तेथे
    होतो त्यांचा आदर

पती अंगचे गुण
    खुलली नारयणाची प्रभा
माझ्या मुखावर
    कुंकवाची शोभा

सूर्याच्या तेजाने
    डोळे जसे लपकतात
पती वाटेने चालतांना
    लोक थबकतात

तुम्ही नारायणा
    कृपा केली मजवर
गणगोत दूर
    मला भर्ताराचं सुख फार

पती रस्त्याने चालती
    लोक जोडती हात
माझ्या मनाचा हुरुप
    मावेना गगनात

# नदी सारी रे आटली

बापाचा पैसा
किती होता तू लखपती
दारुच्या धुंदीने
त्याची सारी झाली माती

दारू आणि रांड
गोड किती रे वाटली
भुरळी तिने घातली
नदी सारी रे आटली

दारू आणि रांड
तुला चिकटला जसा गोंध
अरे फुटलं तुझं डोकं
भली मोठी पडली चोंद

दारू नि रांडीने
आग लावली घराला
चार फुटाणे नाही
तुझ्या पोटच्या पोराला

दारू रांडीच्या धुंदीत
नाही आला वठणीला
आता मिळेना भाकरी
मिरची नाही चटणीला

दारू नि रांडीनं
तुला काय लाभ झाला
लाकडाच्या सालीवानी
तुला उभाच सोलला

दारू नि रांडीत
गेली सारी रे नवती
घोड्याच्या गोमाश्या
आता तुझ्या भवती

तझ्या खिशातले नोट
सारे कसे रे आटले
अरे तुझ्या टाळूवर
तिने मीरे वाटले

दारू नि रांडीत
किती खूष तू झाला रे
आता कर्जाच्या बोजाचे
डोक्यावर भारे

दारू आणि रांड
तीने संसाराला भंग
कर्जाने भणंग
गेला संसाराचा रंग

रांड म्हणे, हौस मला
आवडते सरी
छाती खुपसली सुरी
तू कर्जबाजारी

अहो दागिना करा मला
म्हणे बोरमाळ
कर्जानं तोंड काळं
तुझ्या घराचं फिरल गाडं

अहो दागिना हवा मला
सोन्याचा चितांग
नाही तर मोडेल बघा
तुमची मी टांग

अहो दागिना हवा अता मला
पुणेशाही ठुशी
ह्या रांडीने ठेवली नाही
तुझ्या घरात कपबशी

अहो दागीना हवा मला
सोन्याचे फूल
तुला कर्ज झाले फार,
घरची मोडली चूल

दारू नि रांडी पायी
किती झाला वेडा
कर्ज झाले आता,
झाडण्याला नाही फडा

घरी लग्नाची बायको
लुगड्याला मारी गाठा
रांडीच्या घरात
तू करून दिला साठा

दारू नि रांडीसाठी
फेकल्या तू नोटा
घरच्या बायकोला
दिला रिकामा लोटा

दारूच्या धुंदीत
फेऱ्या मुंबई पुण्याच्या
वीटा घसरत गेल्या
घराच्या भिंतीच्या

दारूच्या व्यसनात
तुझा सर्वनाश झाला
हरिणीच्या वेगाने
सारा पैसा गमावला

## दोन शब्द गोड

पक्वान्न पक्वान्न
नाही पक्वान्न गोड
नरदेहात येऊन
तुम्ही गोड बोला थोडं

पक्वान्न पक्वान्न
नाही पक्वान्न खरं
दोन शब्द गोड बोला
हेच वाटे बरं

नुसतेच खाउन
नको जमिनीला भार
मिळालेल्या नरदेहाचा
काही करा उद्धार

आज ना उद्या
हे जीवन जाईल
मिळालेल्या जन्माचे
मग मागे काय राहिल

गेला कपड्याचा रंग
पुन्हा देईल रंगारी
आला चौऱ्याशीचा फेरा
नरदेह गेल्यावरी

नरदेहात येउन
    कसं जाईल तुझे जीणे
पिऊ नको पाणी
    दुसऱ्याच्या ओंजळीने

दुसऱ्याच्या ओंजळी
    पाणी येईल घोटभर
आपल्याच हाताने
    तू घे ना पोटभर

दुसऱ्याच्या ओंजळीत
    पाणी गढूळ मनाचे
आज कालच्या जगात
    कोणी नाही कोणाचे

केव्हातरी एकवेळ
    देहाचा होतो भंग
हे द्रव्य मिळवून
    नाही येत आपुल्या संग

प्रपंची हिशेब
    बघती पैशा-पैशाचा
येतो वरचा हुकूम
    मग नाही तो कामाचा

कर जगाचा विचार
    करू नको मेरा मेरा
रे भल्या माणसा
    नको चौऱ्यायशीचा फेरा

संगत धरावी
धरावी ती सज्जनाची
जावे सदा राऊळात
गोडी असावी भजनाची

देवधर्म करावा
आपुल्या जन्मासाठी
आषाढी कार्तिकी
पडाव्या संतांच्या गाठी

नरदेहाला येऊन
नको अज्ञानी मन
ग्रंथ वाचून आपण
शहाणे करावे जन

विचार करावा
जसे आले तसे जाल
शेवटच्या वेळेला
संगती काय न्याल.

प्राणी जातो हा क्षणी
काही नको त्याला कारण
पांडुरंगाचे नाव
करा हृदयी धारण

धन कमाविले तरी
गेला एकलाच उठून
संसाराची माया
व्यर्थ झाली करून

कसं जावे कार्तिकीला
    घरी शेतीचा पसारा
आले बोलावणे मग
    चला सर्व विसरा

किती गणगोत
    आत्या-मावशी-मामाचं
अंतःकाळच्या वेळी
    कोणी एक नाही कामाचं

# तुझ्या परीस

अग जन्माला येऊन
    काय केलं तू हेंगाडे
तुझ्या परीस बरे
    लढ्याचे शिंगाडे

भलत्त्या गोष्टीचा बाई
    कर तू त्याग
देहाला मुळी नको
    कलंकाचा डाग

स्वभावाने राहिली
    जर कडू शेरणी
जाशील कशी तू
    मग देवाच्या चरणी

गर्व-गुमान तुला
    आलं हे कशानं
केव्हा एक वेळ
    तुला दिसेल स्मशान

कमशीलाच्या पोटी
    जशा बाबडल्या तुरी
शीलवंताच्या पोरीला
    चारित्र्याची मातबूरी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२२२१९
दा. क्र. काव्य
२३४२
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## संसार संसार

संसार संसार
    रहाट गाडग्याचा खेळ
सुख आणि दुःख
    दोहोंचा होतो मेळ

माणसाचे विचार
    नसावे पायापाशी
जन्माला येऊन
    पोट भरते पहा माशी

आला चिमण्यांचा थवा
    बसला राशीवर
होत नाही काही कमी
    देवाची कृपा मजवर

आल्या चिमण्यांना
    हाणू-मारू नका कोणी
दाणे टिपतात
    त्यांची पिलं गोजीरवाणी

संसार संसार
    नाही संसार सरत
कितीही मोठे घर
    नाही राहायला पुरत

सोडेना देव कधी
ज्याचे त्याला भोग
आंब्याच्या वेळी
कावळ्याला मुखरोग

REFBK-0022295
REFBK-0022295